रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १९०
www.ramprahar.com
शनिवार, २५ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
माथेरान घाटामध्ये बर्निंग कारचा थरार/२
कृती आराखडा प्रभावीपणे राबवा -गोविंदाराज/५
लायन्स क्लबच्या रुग्णालयास सहकार्य करणार : नार्वेकर/७

## ‘जेपीसी’च्या बैठकीत राडा; १० खासदार निलंबित



**नवी दिल्ली :** वक्फ विधेयकावरील संयुक्त संसदीय समितीचा (जेपीसी) ५०० पानी अहवाल तयार झाला आहे. या अहवालावर शुक्रवार आणि शनिवारी अशी दोन दिवस बैठक होऊन चर्चा होणार होती, मात्र बैठकीच्या पहिल्या दिवशीच खासदारांमध्ये गदारोळ झाला. त्यामुळे विरोधी पक्षाच्या १० खासदारांना समितीमधून निलंबित करण्यात आले आहे. निलंबित करण्यात आलेल्या खासदारांमध्ये कल्याण बॅनर्जी, मोहम्मद जावेद, ए. राजा, असदुद्दीन ओवेसी, नसीर हुसेन, मोहिबुल्ला, मोहम्मद अब्दुल्ला, अरविंद सावंत, नदीम-उल हक आणि इम्रान मसूद यांचा समावेश आहे. या बैठकीत अहवालावर चर्चा होऊन तो विधी मंत्रालयाकडे दिला जाणार होता. दरम्यान, यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात हे विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे.

# केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी

## केंद्रीय मंत्री अमित शाह यांची ग्वाही; नाशिकमध्ये सहकार परिषद



**नाशिक : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासन कटिबद्ध आहे. सहकारातूनच शेतकऱ्यांच्या उन्नतीचा मार्ग समृद्ध होऊन देशातील शेतकरी आत्मनिर्भर होईल. त्यासाठी शेतीला विज्ञान व तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक असून यासाठी केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी राहील, असे प्रतिपादन केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांनी केले. नाशिकच्या अजंग (ता. मालेगाव) येथे व्यंकटेश्वरा को. ऑप. पॉवर ॲण्ड ग्रो प्रोसिसिंगच्या माध्यमातून आयोजित सहकार परिषदेत ते बोलत होते.

या परिषदेस केंद्रीय सहकार व नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा (विदर्भ, तापी खोरे व कोकण विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ, आमदार छगन भुजबळ, आमदार दिलीप बोरसे, माजी मंत्री डॉ. सुभाष भामरे, डॉ. भारती पवार, माजी खासदार डॉ. विकास महात्मे, महामंडलेश्वर स्वामी संविदानंद सरस्वती आदी उपस्थित होते. या वेळी केंद्रीय मंत्री शाह यांच्या हस्ते माती परीक्षण प्रयोगशाळेचे उद्घाटन करण्यात आले तसेच बेळगाव येथील काजू उद्योगाचे दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन करण्यात आले.

केंद्रीय मंत्री शाह म्हणाले की, दिवंगत पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी जय जवान जय किसानची घोषणा दिली. देशाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी या घोषणेला जय विज्ञानची जोड दिली, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी सहकार विभागाची स्थापना केली. आगामी काळात सेंद्रीय शेती आणि या शेतीतून मिळालेल्या उत्पादनांच्या प्रमाणीकरणासाठी केंद्रीय सहकार विभागाच्या माध्यमातून संस्थांची निर्मिती करण्यात येईल, जेणेकरून जागतिक बाजारपेठेत भारतीय शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळू शकेल.

# मुंबईचा उमेश गुप्ता ‘नमो चषक श्री’

## राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा उत्साहात; मान्यवरांची उपस्थिती

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)





**लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरी**
**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

भव्य दिव्य आयोजन आणि स्पर्धकांच्या उत्कृष्ट प्रदर्शनामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरीत दिमाखदारपणे झालेल्या राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेत मुंबई उपनगरच्या उमेश गुप्ता याने नमो चषक श्री २०२५ किताब पटकाविला. एक लाख ११ हजार रुपये आणि चषकाचा तो मानकरी ठरला.

भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल व उरणच्या वतीने २३ ते २५ जानेवारीपर्यंत भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५चे भव्य दिव्य आयोजन उलवे नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मागील बाजूच्या मैदानावर अर्थात लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरीत करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग असलेली राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा उत्स्फूर्तपणे, उत्कृष्ट नियोजनात आणि क्रीडा रसिकांच्या उपस्थितीत जल्लोषात पार पडली.

या स्पर्धेसाठी प्रमुख मान्यवर म्हणून पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशनचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मोरे, सरचिटणीस अजय खानविलकर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते व नमो चषक स्पर्धेचे मुख्य आयोजक परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील, अजय बहिरा तसेच अमर म्हात्रे, विजय घरत, जयवंत देशमुख, भार्गव ठाकूर, अंकुश ठाकूर, विश्वनाथ कोळी, स्वप्नील ठाकूर, शैलेश भगत, स्पर्धा समन्वयक मयुरेश नेतकर, शरीरसौष्ठव स्पर्धा संयोजक दिनेश शेळके, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर आदी उपस्थित होते. (पान २ वर..)



**उलवे नोड : भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल व उरणच्या वतीने आयोजित नमो चषक २०२५ या भव्य क्रीडा महोत्सवास रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व शेकापला अलिकडे राम राम ठोकलेले आस्वाद पाटील यांनी शुक्रवारी भेट दिली. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे स्वागत व सन्मान केला. या वेळी तत्कालीन खेड (पुणे) मतदारसंघाचे माजी खासदार अशोक मोहोळ, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख तसेच भार्गव ठाकूर, विजय घरत आदी उपस्थित होते.**

# भंडाऱ्यातील कंपनीमध्ये भीषण स्फोट

## आठ जणांचा मृत्यू, परिसरातील गावांना हादरे



**भंडारा : प्रतिनिधी**

भंडारा शहराजवळील जवाहरनगर येथील आयुध निर्माण कंपनीत शुक्रवारी (दि. २४) सकाळी १०च्या सुमारास भीषण स्फोट होऊन आठ जणांचा मृत्यू व काही कामगार जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

ऑर्डिनन्स कारखान्यातील सी सेक्सनमध्ये भीषण स्फोट झाला. या कंपनीत दारूगोळा तयार करण्यात येतो. स्फोटाची तीव्रता इतकी होती की त्याचा आवाज जवळपास तीन-चार किलोमीटरपर्यंत गेला. परिसरातील गावांमधील लोक भयभीत होऊन घराबाहेर धावले.

या स्फोटाची माहिती मिळताच पोलीस, अग्निशमन दल प्रशासकीय अधिकाऱ्यांनी धाव घेतली. अधिकची मदत म्हणून एसडीआरएफ यांना पाचरण करण्यात आले. जखमींना तातडीने उपचारासाठी स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# टोरेस गैरव्यवहार : ईडीने गोठवली बँकेतील खाती

**मुंबई : प्रतिनिधी**

टोरेस गैरव्यवहार प्रकरणात सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) मोठ्या प्रमाणात संशयित कागदपत्रे, डिजिटल पुरावे जप्त केले आहेत तसेच मे. प्लाटिनम हेर्न प्रा. लि. (टोरेस ज्वेलरी) आणि त्याच्या सहयोगी संस्थांच्या नावावर असलेली बँक खाती गोठवण्यात आली आहेत. त्यात २१ कोटी ७५ लाख रुपये असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

या प्रकरणी प्लाटिनम हेर्न प्रा.लि. व त्याच्या सहयोगी संस्थांच्या बँक खात्यांची तपासणी केली. यात संशयास्पद व्यवहार व इतर संस्थांशी असलेल्या संबंधांचा उलगडा झाला. या संस्थांना दिलेल्या देयकांची चौकशी सुरू आहे. या संपूर्ण गैरव्यवहारात सव्वालाख गुंतवणूकदारांचे एक हजार कोटी रुपये असल्याचा संशय आहे. या प्रकरणी नऊ आरोपींविरोधात ब्लू कॉर्नर नोटीस जारी करण्यात आलेली आहे.

## निवडक

### सैफ हल्लाप्रकरणी आरोपीच्या पोलीस कोठडीत वाढ

**मुंबई :** अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणारा आरोपी मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजाद उर्फ विजय दास (३०) याच्या पोलीस कोठडीत वांद्रे न्यायालयाने वाढ केली आहे. वांद्रे आरोपीची पोलीस कोठडी संपत असल्याने शुक्रवारी (दि. २४) त्याला न्यायालयात हजर करण्यात आले होते. कोर्टाने आरोपीला २९ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

### एसटीच्या तिकीट दरात वाढ; रिक्षा, टॅक्सीचीही होणार भाडेवाढ

**मुंबई :** गेल्या तीन वर्षात एसटी बसचे तिकीट दर स्थिर होते. आता या दरात १४.९७ टक्के वाढ करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे. ही भाडेवाढ आजपासून लागू करण्यात येत आहे, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी (दि. २४) दिली. याबरोबरच १ फेब्रुवारीपासून रिक्षा आणि टॅक्सीचीदेखील भाडेवाढ होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



# आमदार महेश बालदी यांच्याकडून जलजीवन मिशनचा आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समितीच्या कार्यालयात शुक्रवारी (दि. २४) जलजीवन मिशनची आढावा बैठक उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

या बैठकीला बैठकीला गटविकास अधिकारी समीर वाठारकर, फॉरेस्ट अधिकारी एम.डी. राठोड, विनोद मावरे, जिल्हा विकास समन्वयक आणि सहनियंत्रण समिती सदस्य राजेंद्र पाटील, मंगेश वाकडीकर, हभप अनंत पाटील यांच्यासह ३८ ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, लोकप्रतिनिधी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

या वेळी आमदार महेश बालदी यांनी, जनतेच्या हितासाठी आपण सर्वांनी काम केले पाहिजे. जलजीवन मिशनच्या माध्यमातून लोकांची सेवा करण्याची सुवर्णसंधी आपल्या सर्वांना मिळाली आहे. या योजनेत उद्भवणाऱ्या समस्यांचे निराकरण करून नागरिकांपर्यंत पाणी कसे पोहचेल याचा विचार केला पाहिजे, असे म्हटले.

# जीवनदूत हेच खरे देवदूत -मंत्री भरत गोगावले

## रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत संस्था, व्यक्तींचा सत्कार



**अलिबाग : प्रतिनिधी**

कुठेही अपघात झाला तर शासकीय यंत्रणा पोहचण्यापूर्वी जीवनदूत तेथे पोहचतात. आपला जीव धोक्यात घालून जखमींना बाहेर काढतात. वेळेत रुग्णालयात दाखल करतात. त्यामुळे जखमींना जीवनदान मिळते. हे खरे देवदूत आहेत. त्यांचे कौतुक केलेच पाहिजे. हे लोक निःस्वार्थीपणे काम करत असतात. त्यांना शासनाकडून मदत मिळावी यासाठी प्रयत्न करणार, असे आश्वासन रोजगार हमीमंत्री भरत गोगावले यांनी दिले.

रायगड पोलीस दलातर्फे रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत जीवनदूत सन्मान सोहळा अलिबागजवळील कुरूळ येथील आरसीएफ सभागृहात शुक्रवारी (दि. २४) येथे आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी मंत्री गोगावले बोलत होते. या सोहळ्यास आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपवन संरक्षण अधिकारी राहुल पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, तहसीलदार विक्रम पाटील, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे आदी उपस्थित होते. जीवनदूत म्हणून काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींचा या वेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अपघात कमी होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मुंबई-गोवा महामार्गावर मोठ्या प्रमाणावर अपघात होतात. या महामार्गाचे काम पूर्ण झाल्यावर अपघाताचे प्रमाण घटेल. हा महामार्ग पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत, असे मंत्री भरत गोगावले म्हणाले.

जीवनदूतांचा सत्कार स्तुत्य उपक्रम आहे. त्यांच्या कामाची दखल घेतलीच पाहिजे, असे आमदार महेंद्र दळवी यांनी म्हटले.

जीवनदूत हे देवाच्या रूपाने आलेले दूत असतात. अडचणीत असलेल्यांना वाचविण्यासाठी ते येतात व त्यांचा जीव वाचवतात, असे सांगून वाहतुकीचे नियम सर्वांनी पाळल्यास अपघात कमी होतील. अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्यांवर कोणतीही कारवाई करायची नाही हे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. ते सर्व लोकांपर्यंत पोहचले पाहिजे, असे जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले. (पान २ वर..)

# नमो चषक स्पर्धेत खेळाडूंच्या क्रीडा कौशल्याला वाव

## प्रसिद्ध धावपटू ललिता बाबर यांची भेट व शुभेच्छा

**लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरी**
**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

(अधिक छायाचित्रे पान ३,८ वर..)





लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल व उरणच्या वतीने उलवे नोडमध्ये सुरू असलेला भव्य क्रीडा महोत्सव नमो चषक २०२५ स्पर्धेला खेळाडू आणि क्रीडारसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. दरम्यान, या स्पर्धेला अर्जुन पुरस्कार विजेती आंतरराष्ट्रीय धावपटू ललिता बाबर यांनी शुक्रवारी (दि. २४) भेट देत शुभेच्छा दिल्या. क्रीडाप्रेमी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे स्वागत व सन्मान केला.

लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरीत होत असलेल्या या नमो चषक क्रीडा महोत्सवात खेळाडूंची विशेष काळजी घेण्यात आली आहे. नाश्ता, भोजन, प्रवास, प्राथमिक उपचार, आसन व्यवस्था, मदत कक्ष व इतर सुविधाही त्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या क्रीडा महोत्सवात राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा, खो-खो, कबड्डी तसेच धावणे, भालाफेक, थाळीफेक, गोळाफेक, कीड व्हेलीन थ्रो, हातोडाफेक या ॲथलेटीक्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सात हजारपेक्षा जास्त खेळाडूंचा सहभाग लाभला आहे.

२३ जानेवारीला राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा प्रकाशझोतात मोठ्या उत्साहात पार पडली. २४ जानेवारीला प्रकाशझोतात कबड्डी स्पर्धेचे नियोजन होते, तर २५ जानेवारीला खो-खो स्पर्धाही प्रकाशझोतात होणार आहे. याशिवाय धावणे, भालाफेक, थाळीफेक, गोळाफेक, कीड व्हेलीन थ्रो, हातोडाफेक या ॲथलेटीक्स स्पर्धा तीनही दिवस म्हणजेच २५ जानेवारीपर्यंत दिवसा होणार आहेत. एकूण तब्बल १४ लाख ९१ हजार २०० रुपयांची रक्कम आणि चषक अशा प्रकारे पारितोषिकांचे स्वरूप आहे. स्पर्धा संपन्न झाल्यावर त्या त्या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना बक्षिसे देऊन गौरविले जात आहे.

नमो चषकामुळे खेळाडूंच्या क्रीडा कौशल्याला वाव मिळण्यास मोठी मदत झाली असून खेळाडू आणि क्रीडाप्रेमी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, मुख्य आयोजक परेश ठाकूर आणि सहकाऱ्यांना धन्यवाद देत आहेत. स्पर्धेस्थळी दर्जेदार आयोजनाबरोबरच उत्तम प्रकारे व्यवस्था करण्यात आली आहे. (पान २ वर..)

# बापाचा मुलीवर लैंगिक अत्याचार

**महाड : प्रतिनिधी**

वासनांध नराधमाने स्वतःच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना महाड तालुक्यात उघडकीस आली आहे. या प्रकरणी आरोपीविरोधात महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी ४३ वर्षीय असून मूळचा उत्तर प्रदेशातील रहिवासी आहे. त्याची मुलगी सध्या १९ वर्षांची असून तिच्यावर गेली आठ वर्ष अत्याचार सुरू होता.

दरम्यान, माणगाव तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीचा दोन जणांनी विनयभंग केल्याची घटना महाड तालुक्यात घडली. पीडिता १५ वर्षांची असून तिला आरोपींनी संगनमताने महाड येथील घरी नेले व रात्रीच्या वेळेस एकाने तिच्याशी असभ्य वर्तन केले. आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही घटनांचा अधिक तपास सुरू आहे.

# सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात आता मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या प्रकरणांची माहिती त्यांच्याच जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात गरजूंना अत्यावश्यक आरोग्यसेवा व आर्थिक सहाय्य देण्याकरिता मंत्रालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष कार्यरत करण्यात आला आहे. ही सेवा नागरिकांना त्यांच्याच जिल्ह्यात सहजपणे उपलब्ध व्हावी, अशी सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्याचा शासन निर्णय काढण्यात आला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे कामकाज अधिक सुलभ व पेपरलेस करण्यात येत आहे. महागड्या वैद्यकीय उपचारांसाठी गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना आर्थिक मदत मिळविण्याची प्रक्रिया पूर्णतः पेपरलेस करण्यात येणार असून या प्रक्रियेसाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही. याकरिता लवकरच स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात येणार असल्याची माहिती श्री. नाईक यांनी दिली आहे. यामुळे नागरिकांचा वेळ व खर्च टाळता येणार आहे.

# उद्धव ठाकरेंची अवस्था शोलेमधील असरानीसारखी -मंत्री आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांची अवस्था शोले मधील असरानी सारखी होणार असून म्हणूनच आपण एकटे लढणार असे सांगत आहेत. आधुनिक महाराष्ट्रातील दगाबाज नेते म्हणून उद्धव ठाकरे यांची ओळख आहे, अशा शब्दांत माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी हल्लाबोल माध्यमांशी बोलताना केला.



उद्धव ठाकरे यांच्या कालच्या सभेतील भाषणाचा आपल्या एक्स पोस्टवरून समाचार घेताना ॲड. आशिष शेलार म्हणले की, श्रीमान उध्दव ठाकरे यांचा जन्म २७ जुलै १९६०चा आहे. त्यामुळे १९५१ साली स्थापन झालेल्या जन संघाच्या विषयी त्यांना काही माहिती असण्याचे कारण नाही. ५ आणि ६ एप्रिल १९८० रोजी दिल्लीत जन संघांच्या नेत्यांची बैठक होऊन नवीन राजकीय पक्ष स्थापन करण्याचा निर्णय झाला त्यावेळी श्रीमान उध्दव ठाकरे यांचे वय २० वर्षे होते त्यामुळे याबाबत त्यांना काही माहिती असण्याचे कारण नाही.

फोटोग्राफी करण्यात दंग असलेल्या आणि करगोट्यातून इज्जत निसटत्याच्या वयात असतानाच्या काळातील संदर्भ देऊन बोलणाऱ्या श्रीमान उध्दव ठाकरे यांना आमचे सांगणे आहे की, तुम्ही कुठे जन संघ आणि भाजपाच्या स्थापनेवर बोलता? १०० वर्षे पुर्ण करणाऱ्या संघावर बोलता? पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जगभरात देशाचा बहुमान उंचावला तसेच भाजपा जगात एक नंबरचा पक्ष ज्यांनी करुन दाखवला त्या अमितभाई शाह यांच्यावर बोलता ..? समाजवाद्यांची पुस्तके वाचून महाराष्ट्र आणि जनसंघाचा इतिहास तुम्हाला कळणार नाही. श्रीमान उद्धव ठाकरे तुम्ही अमिताभाई शाह यांच्या पाठीवर वळ उठवणार आहात? कसले? केव्हा ? आधी तुम्ही तुमचे वडिल म्हणजे अखंड हिंदूंचे आशास्थान वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जेव्हा २६ जुलैच्या पुरात अडकले होते.. तेव्हा तुम्ही मिठी नदीच्या पुराला पाठ दाखवून पंचतारांकित हॉटेलमध्ये पळालात त्या दुर्दैवी घटनेचे वळ तुमच्या पाठीवर आणि आयुष्यावर खूप खोल आहेत, ते कधीतरी मातोश्रीच्या आरशा समोर उभे राहून पहा.

कंत्राटदाराकडून कटकमिशन खाऊन मुंबईचा जो बट्याबोळ केलात त्याचे व्रण दोन कोटी मुंबईकरांच्या काळजावर आहेत त्याच्या सुरकुत्या तुम्हाला तुमच्या चेहऱ्यावर दिसतात का? हे पण आरशाला विचारुन पहा. मग कळेल जखमा खोल आहेत.. की... तुमच्या मेंदूतच झोल आहे, अशा शब्दांत त्यांनी जोरदार पलटवार केला.

# तब्बल १२० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त

## * पेण नगरपालिकेची धडक कारवाई
## * १७ हजार ९०० रुपयांची दंडवसुली

**पेण : प्रतिनिधी**

सिंगल यूज प्लास्टिकवर बंदी असताना बेधडक प्लास्टिक पिशव्यांचा वापर केला जात आहे. प्लास्टिकमुक्त अभियान राबवूनही त्याला पेणमध्ये दाद दिली जात नाही. त्यामुळे शहरातील दुकानांसह हातगाड्यांवर प्लास्टिक पिशव्यांचा वापर वाढत असून या प्लास्टिक पिशव्यांवर तात्काळ बंदी आणावी, अशी मागणी निसर्ग मित्रकडून केली जात होती. या पार्श्वभूमित्वर पेण नगर परिषदेने मोहीम राबवून तब्बल ९० किलो प्लास्टिकच्या पिशव्या जप्त केल्या असून याबद्दल १६ हजारांचा दंड वसूल केला आहे.



सरकारने सर्व महापालिका, नगरपालिका तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत यांना प्लास्टिकमुक्त अभियान राबवण्याचे आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे कारवाई केली जात असली तरी पेणमधील प्लास्टिक मुक्त अभियानाला रहिवाशांसहा व्यापारी केराची टोपली दाखवत होते.

हातगाडी, दुकानदार, भाजी व्यापारी आजही प्लास्टिक पिशव्यांचा सर्रास वापर करत आहेत. शहरातील गटारे प्लास्टिकच्या पिशव्यांनी तुडुंब भरत असून शहराच्या अनेक कचरा डेपोजवळ प्लास्टिक पिशव्या मोठ्या प्रमाणात टाकण्यात येत आहेत. अखेर धडक कारवाई करत नगर परिषदेने हातगाड्यांवरील प्लास्टिकच्या पिशव्या जप्त करून दंडात्मक कारवाई केली आहे.

पेण नगर परिषदेने जवळपास १२० किलो प्लास्टिकच्या पिशव्या जप्त केल्या आहेत आणि १६ हजारांचा दंड ठोठावला आहे. यापुढे दुकानदारांसह रहिवाशांनी प्लास्टिक पिशव्या बंद कराव्यात अन्यथा कारवाई केली जाईल, अशी माहिती नगरपरिषदेचे आरोग्य अधिकारी दयानंद गावंड यांनी दिली.

पेणमध्ये प्लास्टिक पिशव्यांचा वापर वाढल्याने अस्वच्छता वाढून गटारे तुंबत आहेत. आता नगरपालिकेने दंडात्मक कारवाई करून प्लॅस्टिक पिशव्या जप्त केल्या असल्या तरी अशीच कारवाई नियमित करायला हवी असे या वेळीनिसर्गमित्र उदय मानकवळे यांनी सांगितले.

# माथेरान घाटात बर्निंग कारचा थरार

**माथेरान, नेरळ : प्रतिनिधी**

नवी मुंबई येथील जोडपे आपल्या डस्टर गाडीने माथेरान घाटातून माथेरानच्या दिशेने येत असताना गाडीच्या इंजिन कडील भागातून धूर येऊ लागल्याने चालकाने तत्काळ गाडी रस्त्याच्या कडेला थांबवित दोघेही गाडीतून खाली उतरून सुखरूप बाहेर पडले. घटनास्थळी माथेरान, नेरळ पोलीस दाखल झाले,मात्र अग्निशामक दलाची गाडी वेळेवर न पोहचू शकल्याने पर्यटकाची डस्टर गाडी पूर्णतः जळून खाक झाली. हा सगळा प्रकार सकाळी १० च्या वेळेत घडल्याने येथे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला.



नवी मुंबई येथील पर्यटक जोडपे माथेरान घाटातून गाडी (एमएच ४३ एन ९४६८) डस्टर या गाडीने घाटातून माथेरानच्या दिशेने वर येत असताना गाडी च्या पुढील इंजिन भागातून धूर येऊ लागला. तत्काळ चालकाने गाडी थांबवून दोघेही गाडीतून लगेच खाली उतरले. चालकाच्या प्रसंगावधानामुळे येथे मोठा अनर्थ टळला. माथेरान घाटात डस्टर गाडीने पेट घेतला हे वृत्त व याचा विडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला.

# रिटघर येथे बारावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री भैरव देव विद्यालय व श्री रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेज रीटघर येथे बारावीच्या येऊ घातलेल्या बोर्ड परीक्षेच्या अनुषंगाने कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.



कार्यशाळेसाठी खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कॉलेज (स्वायत्त) इंग्रजी विभागाचे डॉ. एस एन परकाळे यांना आमंत्रित करण्यात आले होते. या मार्गदर्शनपर कार्यशाळेमध्ये डॉ. परकाळे यांनी इंग्रजी विषयाच्या बोर्डाच्या पेपरच्या संदर्भात विद्यार्थ्यांना इत्यंभूत माहिती दिली. ती माहिती देत असताना त्यांनी इंग्रजी विषयाचा अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व जुन्या प्रश्नपत्रिका, सराव संच याच्यावरती भर देण्यास सांगितले त्याचबरोबर वेळेचे नियोजन, लेखनाची, नियमित सराव व मांडणी यावरती जाणीवपूर्वक लक्ष देण्याचे सांगितले.

शेवटी त्यांनी विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाच्या संदर्भात असणाऱ्या वेगवेगळ्या शंकांचे निरसन केले.

शेवटी त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील याचे विचार हे यशस्वी आयुष्याची गुरुकिल्ली आहे असे सांगितले. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रामध्ये सिकेटी ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक दिलीप वामन पाटील सर यांनी अकाउंटन्सी या विषयाच्या संदर्भात सखोल असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्याचबरोबर त्यांनी बोर्डाच्या परीक्षेच्या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक बबन साळुंखे यांनी केले व विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा या संदर्भात वेगवेगळ्या सूचना दिल्या. कार्यक्रमासमयी प्रा आजने, प्रा.जाडकर, प्रा. पाटील सर, प्रा.म्हात्रे सर व इतर शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेच्या आभार प्रा. जाडकर सर यांनी मानले.

# पनवेलमध्ये आज भाजपची संविधान गौरव अभियान सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड जिल्हा यांच्या वतीने संविधान गौरव अभियान सभा शनिवारी (दि.२५) सकाळी १० वाजता श्री. रामशेठ ठाकूर साहेब सामजिक विकास मंडळ, मार्केट यार्ड पनवेल या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे कार्यक्रमाचे उद्घाटक असून प्रमुख वक्ते म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची उपस्थिती लाभणार आहे.

यासोबतच प्रमुख मान्यवर म्हणून पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहरे आदी उपस्थित राहणार आहेत. या सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन प्रकाश बिनेदार, विठ्ठल मोरे, विद्या तामडखे, अमित जाधव यांनी केले आहे.

पान १ वरून

## मुंबईचा उमेश गुप्ता 'नमो चषक श्री'

या स्पर्धेत इंडियन नेव्हीचा पी.टी. अनबन उपविजेता ठरला. प्रथम उपविजेता मुंबईचा सागर कातुर्डे, उत्कृष्ट पोझर म्हणून मुंबई उपनगरचा हरमित सिंग, तर प्रगतिकारक शरीरसौष्ठवपटू म्हणून पुण्याच्या विशाल सुरवसे याने मान मिळवला. सांघिक विजेतेपद रायगड संघाने, उपविजेतेपद पुणे संघाने, तृतीय क्रमांक मुंबई उपनगर, चतुर्थ क्रमांक मुंबई, तर पाचवा क्रमांक ठाणे पश्चिम संघाने पटकावला.

**गटनिहाय निकाल**

८५ प्लस वजन गट : प्रथम क्रमांक पी.टी. अनबन (इंडियन नेव्ही), द्वितीय हरमित सिंग (मुंबई उपनगर), तृतीय सोहम चाकणकर (पुणे), चतुर्थ निलेश रेमजे (मुंबई), पाचवा अभिषेक लोंढे (मुंबई), सहावा क्रमांक जीवन सकपाळ (मुंबई).

८५ किलोखालील वजन गट : प्रथम क्रमांक विशाल सुरवसे (पुणे), द्वितीय संदेश सामंत (सिंधुदुर्ग), तृतीय सुखदीप सिंग (रायगड), चतुर्थ अर्जुन शर्मा (ठाणे), पाचवा महेंद्र पाचपुते (पुणे), सहावा क्रमांक ऋत्विक जाधव (पुणे).

८० किलोखालील वजन गट : प्रथम क्रमांक सागर कातुर्डे (मुंबई), द्वितीय कमलेश अंबारा (पुणे), तृतीय संजय प्रजापती (मुंबई), चतुर्थ अक्षय शिंदे (पुणे), पाचवा प्रभाकर पाटील (रायगड), सहावा क्रमांक सचिन हगवणे (पुणे).

७५ किलोखालील वजन गट : प्रथम क्रमांक भगवान बोराडे (मुंबई उपनगर), द्वितीय आकाश दडमल (पुणे), तृतीय उदय देवरे (रायगड), चतुर्थ विशाल धावडे (उपनगर), पाचवा मंगेश भोसले (पश्चिम ठाणे), सहावा क्रमांक अक्षय शिंदे (पुणे).

७० किलोखालील वजन गट : प्रथम क्रमांक उमेश गुप्ता (उपनगर), द्वितीय स्वप्नील नरवडकर (इंडियन नेव्ही), तृतीय संकेत भरम (उपनगर), चतुर्थ दीपक राऊळ (रायगड), पाचवा प्रशांत पोराळे (पुणे), सहावा क्रमांक रोशन दळवी (कोल्हापूर).

६५ किलोखालील वजन गट : प्रथम क्रमांक उद्देश ठाकूर (रायगड), द्वितीय नरेंद्र व्हालेकर (पुणे), तृतीय संदीप सावळे (उपनगर), चतुर्थ सचिन सावंत (पुणे), पाचवा निलेश धोंडे (पुणे), सहावा क्रमांक सचिन बोईनवाड (पश्चिम ठाणे).

६० किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक बाळू काटे (पुणे), द्वितीय गणेश पाटील (रायगड), तृतीय जितेश मोरे (मुंबई), चतुर्थ जुगल शिवणे (रायगड), पाचवा सुयश सावंत (उपनगर), सहावा क्रमांक अमोल वायल (पुणे).

५५ किलो खालील वजन गट : प्रथम क्रमांक हनुमान भगत (रायगड), द्वितीय राजेश तारबे (मुंबई), तृतीय अजय ओजरकर (पुणे), चतुर्थ संजय भोपी (रायगड), पाचवा दीपक कांबळे (पुणे), सहावा क्रमांक संदेश भोईर (रायगड).

१७१ सेंटीमीटरवरील गट : प्रथम क्रमांक बॉबी पाटील (रायगड), द्वितीय राजेश सिंग (पालघर), तृतीय शुभम पवार (पुणे), चतुर्थ मयूर शिंदे (नाशिक), पाचवा रोहन ठाकूर (रायगड), सहावा क्रमांक अक्षय शिंदे (पुणे).

१७१ सेंटीमीटरखालील गट : प्रथम क्रमांक रोहन वाणी (रायगड), द्वितीय नरेंद्र वाल्हेकर (पुणे), तृतीय अनिकेत पाटील (रायगड), चतुर्थ निलेश गुरव (उपनगर), पाचवा सचिन बोईनवाड (ठाणे पश्चिम), सहावा क्रमांक कौस्तुभ पाटील (रायगड).

मास्टर ४० प्लस गट : प्रथम क्रमांक रवींद्र माने (इंडियन नेव्ही), द्वितीय कुमाम कोईरेम्बा (ठाणे), तृतीय दीपक राऊळ (रायगड), चतुर्थ स्वप्नील अशाइत (पालघर), पाचवा चिराग पाटील (पालघर) तर सहावा जयप्रकाश नार्वेकर (सिंधुदुर्ग). सर्व विजेत्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

**अशी होती बक्षिसे**

*किताब विजेता एक लाख ११ हजार रुपये, उपविजेता ५१ हजार रुपये, तृतीय क्रमांक २१ हजार रुपये, बेस्ट पोझर ११ हजार रुपये, सांघिक विजेता ११ हजार रुपये, सांघिक उपविजेता आठ हजार रुपये, सांघिक तृतीय सहा हजार रुपये, सांघिक चतुर्थ पाच हजार रुपये, सांघिक पाचवा क्रमांक चार हजार रुपये. ८५, ८०, ७५, ७०, ६५, ६०, ५५ किलो वजनाखालील गट, ८५ किलोवरील गट, १७१ सेंटीमीटरखालील व १७१ सेंटीमीटरवरील आणि मास्टर ४० प्लस या प्रत्येक गटातील अनुक्रमे प्रथम क्रमांकास १५ हजार रुपये, द्वितीय १२ हजार रुपये, तृतीय आठ हजार रुपये, चतुर्थ सहा हजार रुपये, पाचवा चार हजार रुपये, तर सहाव्या क्रमांकाला तीन हजार रुपये रक्कम बक्षीस देऊन गौरविण्यात आले.*

## नमो चषक स्पर्धेत खेळाडूंच्या क्रीडा कौशल्याला वाव

युवा खेळाडूंना प्रोत्साहन मिळण्यासाठी या ठिकाणी देशातील नामांकित क्रीडापटूंचे बॅनर लावण्यात आले असून त्यावर त्यांची प्रेरणादायी माहितीही नमूद करण्यात आली आहे. मैदानात विविध क्रीडा प्रकारात अनेक सामने रोमहर्षक पहायला मिळत असून त्याचा क्रीडारसिक मनमुराद आनंद घेत आहेत.

प्रसिद्ध धावपटू ललिता बाबर यांनी स्पर्धेच्या भव्य आणि दर्जेदार आयोजनाचे कौतुक करून खेळाडूंना प्रोत्साहन व शुभेच्छा दिल्या. त्यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. बाबर यांच्या या भेटीने खेळाडूंमध्ये स्फूर्तीचे वातावरण निर्माण झाले. याबद्दल क्रीडाप्रेमी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आनंद व्यक्त केला. या वेळी ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, स्पर्धा समन्वयक मयुरेश नेतकर, कबड्डी प्रशिक्षक शरद कदम, स्वप्नील ठाकूर, दिनेश खानावकर, देवांशू प्रभाळे, सुधीर ठाकूर, धीरज उलवेकर, शुभ पाटील यांच्यासह पदाधिकारी, आयोजन कमिटी सदस्य आदी उपस्थित होते.

## जीवनदूत हेच खरे देवदूत -मंत्री भरत गोगावले

जनजागृती झाल्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे. अपघातात मृत्यू पावणाऱ्यांची संख्यादेखील कमी झाली आहे. असे असले तरी अपघात होतात. नैसर्गिक आपत्ती येते. त्या वेळी जीवनदूत आपला जीव धोक्यात घालून लोकांचे प्राण वाचवतात. त्यामुळे त्यांचा सत्कार करण्याचा निर्णय आम्ही घेतला, असे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी प्रास्ताविकात सांगितले. भक्ती साठेलकर हिने मनोगत व्यक्त केले. अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# 'केटीएसपी'च्या गैरव्यवहाराचे जयंत पाटीलांकडून पत्रकारांवर खापर!

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक (केटीएसपी) मंडळाच्या कारभाराबाबत संस्थेतीलच कार्यकारणी सदस्य यशवंत साबळे यांनी अनेक गैरव्यवहाराबाबत संस्थेच्या सभेत आवाज उठवण्याचा प्रयत्न केला आहे, मात्र शेकाप सरचिटणीस माजी आमदार जयंत पाटील यांनी याचे खापर प्रसारमाध्यमांवर फोडण्याचा केविलवाणा प्रयत्न केला.

खोपोलीमधील खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. सदस्य यशवंत साबळे यांनी पोलिसांत केलेल्या तक्रारीनंतर कार्यवाह किशोर पाटील यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यालयात भेट दिली व सर्व संचालकाबरोबर चर्चा केली. पत्रकारांनी कार्यवाह किशोर पाटील प्रकरणावर विचारले असता मात्र त्यांनी सविस्तर बोलण्याच टाळले. या घडलेल्या प्रकरणाचे खापर त्यांनी पत्रकारांवरफोडल्याने पत्रकारांनी याबाबत नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, प्रसारमाध्यमातून जे जे विषय उघडकीस आले त्या आरोपाबाबत वरिष्ठ केव्हा भूमिका स्पष्ट करणार? असा सवाल खोपोलीकर करीत आहेत. गुरुवारी संस्थेत आल्यानंतर प्रसारमाध्यमांनी त्यांना अनेक प्रश्नांबाबत विचारणा केली असता त्यांनी बगल देऊन विद्यमान कार्यकारणीच्या पाठीवर जणू थापच मारली. संस्थेत राजकारण आणण्याचा प्रयत्न करू नये असे जरी पाटील बोलले तरी संस्थेवर असणारे अनेक पदाधिकारी हे एका राजकीय पक्षाचे आहेत हे कसे ते विसरले, अशी चर्चा खोपोलीत सुरू आहे.

# स्व. लक्ष्मण जाधव यांना आदरांजली



**उरण : रामप्रहर वृत्त**

सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद जाधव यांचे वडिल ज्येष्ठ कवी गायक लक्ष्मण जाधव यांचे १९ जानेवारीला निधन झाले. या दरम्यान लॉन्ग मार्च प्रणेते व पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्राध्यापक जोगेंद्र कवाडे, विद्यानंद जाधव यांच्या परिवाराची गुरुवारी (दि.२३) उरण कळंबूसूरे येथील राहत्या घरी जाऊन जाधव परिवाराची सांत्वन भेट दिली.

या वेळी आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ कवी गायक लक्ष्मण गोविंद जाधव यांच्या आठवणींना उजाळा त्यांनी दिला. या भेटीसाठी पनवेलचे माझी उपमहापौर जगदीश गायकवाड, उद्योजक महेंद्र कांबळे (मामा), कवी गायक सुदर्शन जाधव, माजी सरपंच रामदास जाधव, रवींद्र कांबळे, अनंत जाधव, काशिनाथ जाधव, नवनीत जाधव, वैभव जाधव, निलेश जाधव, पांडुरंग जाधव, गणेश जाधव, सागर जाधव व भिमाई महिला मंडळाच्या सर्व सदस्या समस्त कळंबूसूरे जाधव भावकी यांचीही उपस्थिती लाभली.

# कळंबोलीत शासकीय ध्वजारोहण

**नवी मुंबई :** कोकण विभागीय स्तरावरील प्रजासत्ताकदिनाच्या ७६ व्या वर्धापनदिनी २६ जानेवारी २०२५ रोजी कळंबोली, सेक्टर-१७ येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सकाळी ९.१५ वा. शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम होणार आहे. यावेळी राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभास नागरिक, पत्रकार, शालेय विद्यार्थी, शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय पोषाखात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. कार्यक्रम स्थळी येताना सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया कोणतीही बॅग सोबत आणू नये, असे आवाहन कोंकण विभागीय आयुक्त डॉ.राजेश देशमुख यांनी केले आहे.

# ऋषितुल्य पत्रकार रामभाऊ जोशी यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी पत्रकारितेच्या क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व रामचंद्र अण्णाजी उर्फ रामभाऊ जोशी यांचे गुरुवारी (दि.२३) निधन झाले. त्यांचे वय १०१ वर्षे होते. देशाचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्याशी रामभाऊ यांचे बंधुतुल्य नाते होते.



अर्धशतकाहून अधिककाळ पत्रकारितेत व्यतित केल्यावर निवृत्तीनंतरही त्यांनी विविध नियतकालिके, मासिके, विशेषांक यातून आपले लेखन करण्यात रामभाऊंनी खंड पडू दिला नव्हता.

केवळ मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण होऊनही आपल्या परिश्रम, जिद्द, अभ्यास, कार्यनिष्ठा आणि लोकसंग्रह यांच्या बळावर पत्रकारितेप्रमाणेच सांस्कृतिक क्षेत्रातही अव्वल दर्जाचे यश मिळवले.

# आमदार महेश बालदींच्या निधीतून रस्त्याचे काम



## उरणमधील पाले गावात भूमिपूजन

**उरण : वार्ताहर**

आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक निधीतून गुरुवारी (दि.२३) पाले गावात रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले. या वेळी श्रीमती नामूबाई कृष्णा म्हात्रे यांच्या हस्ते नारळ फोडण्यात आला.

या वेळी उरण तालुका भाजप अध्यक्ष रवी भोईर, उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, उरण पूर्वविभाग अध्यक्ष शशी पाटील पाले गाव अध्यक्ष अमित पाटील, चिरनेर पंचायत गण सदस्य पंकज म्हात्रे, युवा नेते धनेश गावंड, स्मिता म्हात्रे आणि संदीप म्हात्रे श्रिया फाउंडेशन संचालक, अजित म्हात्रे, अजय म्हात्रे, यश म्हात्रे, मच्छिंद्र म्हात्रे, हनुमान म्हात्रे, प्रकाश म्हात्रे, रमाकांत म्हात्रे, सुदाम पवार आदींसह पाले गावातील मान्यवर आणि भाजप सदस्य उपस्थित होते.

दरम्यान, या रस्त्यामुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# बीसीटी विधी कॉलेजमध्ये युवा दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय (BCT), नवीन पनवेल, यांनी स्वामी विवेकानंदांच्या स्मरणार्थ श्रद्धांजली समारंभासह राष्ट्रीय युवा दिन साजरा केला. नॅशनल डे सेलिब्रेशन कमिटीचे प्रभारी सहाय्यक प्राध्यापक संग्राम पवार यांनी प्राचार्या सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते आयोजित केलेला हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये अत्यंत श्रद्धेने झाला.

कार्यक्रमाची सुरुवात पाहुणे वक्ते विजय वसंत वेदपाठक, सहाय्यक प्राध्यापक धनश्री कदम (बी.ए.एल.एल.बी. समन्वयक) आणि सहाय्यक प्राध्यापक संग्राम पवार यांच्या हस्ते स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. सकाळी १०:०० वाजता झालेल्या या समारंभात विवेक विचार मंचचे प्रतिनिधी श्री वेदपाठक हे संसाधन व्यक्ती म्हणून उपस्थित होते.

श्री वेदपाठक यांचे आजचा विद्यार्थी हा फक्त उद्याचा नागरिक नाही तर आजचाही आहे या विषयावरील व्याख्यान हे कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या विचारप्रवर्तक सत्रात जातीय भेदभाव, पर्यावरण संवर्धन आणि स्वामी विवेकानंदांच्या शिकवणींसह सामाजिक समस्यांवर लक्ष केंद्रित केले.

सर्वसमावेशक आणि शाश्वत भविष्य घडवण्याच्या त्यांच्या जबाबदारीवर जोर देऊन समाज घडवण्यासाठी सक्रिय भूमिका घेण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. या सत्राने उपस्थितांवर खोलवर प्रभाव टाकला, त्यांना प्रगतीशील मूल्ये अंगीकारण्यासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी सक्रियपणे योगदान देण्याची प्रेरणा दिली.

कार्यक्रमाची सांगता सहाय्यक प्राध्यापक संग्राम पवार यांच्या आभारप्रदर्शनाने झाली, ज्यांनी जेबीएसपी संस्थेच्या प्रयत्नांची कबुली दिली आणि श्री वेदपाठक यांनी सामायिक केलेल्या मौल्यवान अंतर्दृष्टीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय मधील राष्ट्रीय युवा दिन सोहळा स्वामी विवेकानंदांच्या वारशासाठी योग्य श्रद्धांजली म्हणून काम करत होता, विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात त्यांचे आदर्श मूर्त रूप देण्यास प्रोत्साहित करतो.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि.२४) वुमेन डेव्हलपमेंट सेलच्यावतीने इंटरनॅशनल गर्ल चाइल्ड दिवसाच्या निमित्ताने रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले होते.



या स्पर्धेचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दिलेला विषय आत्मसात व्हावा व तसेच त्यांची वेगवेगळी कौशल्ये विकसित व्हावीत हा होता. या रांगोळी स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यार्थिनींना शिक्षणाने भविष्यासाठी सक्षम बनविणे हा विषय दिला होता.

विद्यार्थ्यांनी या विषयावर भाष्य करत रसिकांना स्तब्ध केले. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त, असा प्रतिसाद दिला.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांच्या हस्ते सर्व विजेतांना पारितोषिके देण्यात आली. या स्पर्धेचे आयोजन प्रा. सोनी पांडे यांनी केले तसेच वुमेन डेव्हलपमेंट सेलचे सर्व सदस्य व शिक्षकेतर कर्मचारी सहकार्य केले.

दरम्यान, या महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात.



**कामोठे : श्री गणेश महिला मंडळ व गावदेवी बचत गटाच्या वतीने हळदीकुंकू समारंभ व श्री सत्यनारायणाची महापूजा हनुमान मंदिरात आयोजित करण्यात आली होती. या वेळी पद्मा जगन्नाथ कडू, मुक्ता कमलाकर भेंडे, ताईबाई नारायण घरत, सखुबाई पांडुरंग म्हात्रे, निर्मला नारायण म्हात्रे, गुलाब रामदास जोशी, सारिका कृष्णा भेंडे व इतर भगिनी उपस्थित होत्या.**

# वीर वाजेकर महाविद्यालयाच्या एनएसएसचे श्रमसंस्कार शिबिर

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) विशेष श्रम संस्कार शिबिराचा समारोप उत्साहात झाला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयीन विकास समिती सदस्य तथा कामगार नेते सुधीर घरत उपस्थित होते.



त्यांनी आपल्या भाषणातून आजच्या तरुणाने देशाच्या विकासात हातभार लावणे गरजेचे आहे. भारत हा सध्या विकसनशील देश असला तरी भविष्यात विकसित राष्ट्र म्हणून नावारूपाला येईल. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून खऱ्या अर्थाने विद्यार्थी तयार होत असतो. श्रम प्रतिष्ठा, संस्कार, समाजभान, राजकारण अशा विविध गोष्टींचे ज्ञान प्राप्त होत असते.

वेशवी गावचे नवनिर्वाचित सरपंच अजित पाटील यांनी ग्रामविकास आणि आजचा तरुण यांचे नाते निर्माण व्हायला हवे असे मत व्यक्त केले. माजी-सरपंच विलास पाटील, माजी-सरपंच यांनीसुद्धा विद्यार्थ्यांनी अभ्यास याबरोबरच खेळ, समाजकारण या विषयात रस घेतला पाहिजे. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांना क्रिकेट व बॅडमिंटन सेट भेट म्हणून दिली. रेश्मा ठाकूर ग्रामविकास अधिकारी वेशवी यांनीही शिबिरास मदत केली. प्रभारी प्राचार्य,डॉ.आमोद ठक्कर यांनी अध्यक्षीय मनोगतातून आजचा विद्यार्थी हा डिजिटल तंत्रज्ञानाच्या आहारी जात आहे, असे मत व्यक्त केले.

डिजिटल तंत्रज्ञान आणि अभ्यास यांची सांगड घालून गुणवत्तेचा विकास करावा असे मत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा.राम गोसावी यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.योगेश कुलकर्णी यांनी केले.डॉ.सी.डी.धिंदळे यांनी कार्यक्रमाचे आभार मानले.

# एमपीएएससी कॉलेजचे विशेष श्रमसंस्कार शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

युवकांचा ध्यास शाश्वत ग्राम विकास या संकल्पासह महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य (एमपीएएससी) महाविद्यालय, पनवेलच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १३ ते १९ जानेवारी २०२५ दरम्यान दत्तक गाव रिटघर, पनवेल व निवास स्थान: शांतीवन, नेरे, पनवेल याठिकाणी सात दिवसीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिराचे १३ जानेवारी रोजी उद्घाटन झाले. या वेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, कामगार नेते महेंद्र घरत, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, उपप्राचार्य राजाराम पाटील आदी उपस्थित होते. विशेष श्रमसंस्कार शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांनी रीटघर गावात बंधारा बांधला, शाळेजवळील व गावातील परिसर स्वच्छ केला. गावामध्ये मतदान व स्वच्छतेविषयी रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

या शिबिराच्या बौद्धिक सत्रात प्रा. जगदिश संसारे यांचे पथनाट्य प्रशिक्षण, राजू मुंबईकर यांचे सर्प विज्ञान, पोलीस उपनिरीक्षक मनोज महाडिक यांचे वाहतुकीचे नियम, आनंद नागरे यांचे सोशल मिडिया: युवकांपुढील आव्हाने व संधी, प्रा. सुनील देवरे यांचे राष्ट्रीय सेवा योजनेतून व्यक्तिमत्व विकास, अॅड. प्रमोद ठाकूर यांचे समता, न्याय आणि स्वातंत्र्य: भारतीय राज्यघटनेचे नैतिक आधारस्तंभ, हर्षल सोनावळे यांचे आपत्ती व्यवस्थापन, तेजल खेडेकर यांचे व्यसनमुक्ती विषयावर व्याख्याने झाली. या शिबिरात विद्यार्थ्यांनी प्रार्थना, योग, कवायत, शिस्त, संस्कार व सामाजिक बांधिलकीचे धडे घेतले.

या शिबीराचा समारोप समारंभ १९ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय अधिकारी, रायगड विभाग, रयत शिक्षण संस्था, सातारा एम.के. कोंगेरे यांनी विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण ही शिबीरा मधुन विकसित होतात असे मत त्यांनी या वेळी व्यक्त केले. प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. ज्या स्वयंसेवकांनी शिबिरात उत्कृष्ट कार्य केले त्यांचे मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट शिबिरार्थी म्हणून गौरविण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी वैभव जगझाप यांनी उपस्थितांसमोर सात दिवसांचा आढावा घेतला. कुष्ठरोग निवारण समिती, शांतीवन, नेरे चे कार्याध्यक्ष प्रमोद ठाकूर, कार्यवाहक नीलकंठ कोळी आदींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी हेमंत कनोजा यांनी केले. सूत्रसंचालन महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रूपश्री कडु यांनी केले.

कार्यक्रम अधिकारी वैभव जगझाप, कार्यक्रम अधिकारी रियाज शेख, कार्यक्रम अधिकारी डॉ. विश्वनाथ पटेकर, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रूपश्री कडु, कार्यक्रम अधिकारी संदीप गवळी, कार्यक्रम अधिकारी, हेमंत कनोजा यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नमो चषक 2025












## संपादकीय

# कोर्टाने पकडला कान

मशिदींवरील भोंग्यांबाबत अखेर पुन्हा एकदा मुंबई उच्च न्यायालयालाच संबंधितांचे कान पकडावे लागले आहेत. ध्वनिक्षेपकांचा प्रश्न गेली काही वर्षे अधूनमधून महाराष्ट्रभरात डोके वर काढत असतो. सर्वोच्च न्यायालयानेही या स्वरूपाच्या ध्वनिप्रदूषणाविरोधात स्पष्ट भूमिका घेऊनही आजही नागरिकांनाच त्याविरोधात पुन्हा पुन्हा तक्रारी कराव्या लागत आहेत ही खरोखरीच खेदाची बाब आहे.

**आपल्या प्रार्थनास्थळातील प्रार्थना गावभर ऐकू जाव्यात या अट्टहासातून निव्वळ आसपासच्या नागरिकांना ध्वनिप्रदूषणाचा त्रास सोसावा लागतो. अन्य देशांमध्ये, अगदी काही इस्लामिक देशांमध्येही मशिदींवरील ध्वनिक्षेपकांना विरोध झाल्याची उदाहरणे आढळतात. यापैकी काही देशांमध्ये मशिदींवरील ध्वनिक्षेपकांचे कर्णे वादग्रस्त ठरल्याने काढलेही गेले आहेत, परंतु आपल्याकडे मात्र अनेक ठिकाणी पोलीस आजही या स्वरूपाच्या ध्वनिप्रदूषणाविरोधात कारवाई करण्याचे नाकारतात. मशिदींमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाविरूद्ध कारवाई करण्यास मुंबई पोलिस उदासीन असल्याचा आरोप कुर्ला आणि चुनाभट्टी परिसरातील दोन संस्थांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिकेद्वारे केला होता. अझान आणि धार्मिक प्रवचनांसाठी मशिदी दिवसातून किमान पाच वेळा ध्वनिक्षेपकांचा वापर करतात. परिणामी आपल्या परिसरात असह्य ध्वनिप्रदूषण होते अशी तक्रार या संस्थांमार्फत नागरिकांनी केली होती. या याचिकांवरून न्यायालयाने पुन्हा एकदा त्याविरोधातील कारवाईचे स्वरूप स्पष्ट केले आहे. अशी तक्रार आल्यास संबंधित नागरिकांच्या ओळखीची पडताळणी न करता व त्यांची ओळख गुन्हा करणाऱ्यांकडे उघड न करता संबंधितांवर कारवाई करावी असेही न्यायालयाने म्हटले आहे. वास्तविक आपल्याकडे असंख्य देवळांमध्ये होणाऱ्या काकडआरत्या ध्वनिक्षेपकांविनाच पार पडतात. असे असताना मशिदींवरील भोंगे मात्र वर्षानुवर्षे कायम आहेत. प्रार्थना किंवा धार्मिक प्रवचनांसाठी ध्वनिक्षेपकाचा वापर करणे हा कोणत्याही धर्माचा अविभाज्य भाग नाही. ध्वनिप्रदूषण आरोग्यासाठी हानिकारक असल्यामुळे ध्वनिक्षेपक वापरण्याची परवानगी नाकारली गेल्यास हक्कांचे उल्लंघन झाल्याचा दावा कोणीही करू शकत नाही हे मुंबई उच्च न्यायालयाने आता स्पष्ट केले आहे. इतकेच नव्हे तर या संदर्भात येणाऱ्या तक्रारींवर पोलिसांनी कशी कारवाई करावी याबाबतची मार्गदर्शक तत्त्वेही आखून दिली आहेत. यापूर्वी काही राजकीय पक्षांनी या प्रश्नाविरोधात आक्रमक भूमिका घेतली. त्यामुळे हा प्रश्न ऐरणीवर आला खरा, परंतु परिस्थितीत मात्र फारसा फरक पडला नाही. आता पुन्हा एकदा उच्च न्यायालयानेही ध्वनिक्षेपकविरोधाची भूमिका रास्तच असल्याचे अधोरेखित केले आहे. ध्वनिक्षेपकांच्या अशा तऱ्हेच्या वापरास परवानगी नाकारणे हे सार्वजनिक हिताचे आहे. त्यामुळे राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन होत नाही हे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. सर्व धार्मिकस्थळांना ध्वनिक्षेपकांच्या वापरासाठी परवानगी घ्यावी लागेल हे तर यापूर्वीच स्पष्ट केले गेले आहे. मंदिर, मशीद, गुरुद्वारा व चर्च अशा सर्व ठिकाणी ही परवानगी आवश्यक आहे, परंतु आजही काही धार्मिक स्थळे परवानगीविनाच ध्वनिक्षेपकांचा वापर करत असतात. गेल्या काही वर्षांमध्ये साऊंड सिस्टिमच्या क्षमता वाढत गेल्यामुळे अजानसाठी ध्वनिक्षेपकांचा वापर हा वादाचा मुद्दा बनत गेला आहे. इजिप्त, सौदी अरेबिया यांसारख्या देशांमध्येही मशिदींच्या लाऊडस्पीकर्सवर आवाजाची मर्यादा घालण्याचे प्रयत्न झाले आहेत. भारतात केवळ मशिदीतच नाही तर हिंदू, ख्रिश्चन अशा अन्य धर्मियांमध्येही सणांचे वेळी तसेच उत्सव, लग्न व जत्रेत ध्वनिक्षेपकांचा वापर होतो. ध्वनिक्षेपकांच्या वापराचे नियम व निर्बंध सगळ्यांसाठी समान आहेत हे ध्यानात घेतले पाहिजे.**

# पोलादपूरमध्ये जलकुंडांचा गोळेगणी पॅटर्न



**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी निष्ठा वाहणाऱ्या नरवीर सुर्याजी व तानाजी मालुसरे बंधूंचे समाधीस्थळ तालुक्यातील उमरठ येथे आहे. पर्यटन विकासासाठी कुडपणची भिमाची काठी आणि खोपडचा मोरझोत धबधबा तसेच वाहून गेलेला झुलता पूल यांची चर्चा झाली आहे. कुडपण येथेच शेलारमामांची समाधी आणि महावीरचक्र प्राप्त नायक कृष्णा सोनावणे यांचे जन्मगाव आहे. क्रीडा क्षेत्रात नावलौकिक प्राप्त खेळाडू आहेत. साहित्य क्षेत्रात सोनपंखीकार कवी कै. वसंतराव पालकर, जयंत देशपांडे आणि अरुणा अजित भागवत यांचे उल्लेखनीय नाव आहे. अलिकडेच शेतीसाठी शेततळी करण्याइतपत जमिनी मोठ्या क्षेत्रफळाच्या नसल्याने जलकुंड निर्मितीचा उपाय पोलादपूर तालुका कृषी कार्यालयामधील मनोज जाधव या कृषी सहायकांनी शोधून काढला आहे. त्यामुळे पोलादपूर तालुका जलकुंडांचा गोळेगणी पॅटर्न म्हणून नावारूपाला आला आहे.

कोकणातील शेतकऱ्यांची जमीन दूर्गम, तीव्र उताराची आणि कमी आकाराच्या बांधाबांधांची असल्याने या शेतजमिनीला जलसिंचनासाठी मोठी शेततळी घेणे शक्य होत नाही. त्यामुळे पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी येथे सर्वात आधी छोट्या आकाराचे शेततळे बांधण्यात आले. या शेततळ्याला महाराष्ट्र शासनाकडे जलकुंड नावाने प्रस्ताव करण्याइतपत एकाच गावात २२ जलकुंडांचे काम केले. ३ जानेवारी २०२५ रोजी राज्य सरकारच्या कृषी आयुक्तालयाने परिपत्रक काढून जलकुंडाचा गोळेगणी पॅटर्न कोकणातील पाचही जिल्ह्यांसाठी राबविण्यास मान्यता दिली आहे. कृषी विभागाचे कर्मचारी, पत्रकार आणि लोकप्रतिनिधी यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रेरणा देऊन त्याचे शासनाच्या जीआरमध्ये रूपांतर घडविण्याचा हार जलकुंडाचा पॅटर्न गोळेगणी गावाच्या नावाने ओळखला जाणार आहे.

२०१९मध्ये पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी या टंचाईग्रस्त गावामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून गावातील शेतकऱ्यांनी आंबा व काजू या फळपिकांची लागवड केली. लागवड केलेल्या कलमांना डिसेंबर ते मे या कालावधीत संरक्षित पाणी देण्याकरीता कृषी सहाय्यक मनोज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली नामदेव येरुणकर यांच्या शेतामध्ये पाच मीटर लांब, पाच मीटर रूंद आणि दोन मीटर खोल अशा आकारमानाचे १:०.५० उताराच्या जलकुंडाचे खोदकाम केले व त्याला ५०० मायक्रॉन जाडीचे प्लास्टिक अस्तरीकरण करुन ५२ हजार ७३१ लिटर संरक्षित पाणीसाठा करण्यात आला. जलकुंडात उपलब्ध झालेले पाणी लागवड केलेल्या कलमांना संरक्षित पाणी म्हणून वापर केल्याने कलमे जगण्याच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले.

यानंतर टंचाईग्रस्त गोळेगणी या गावामध्ये विभागीय कृषी सहसंचालक कोकण विभाग ठाणे अंकुश माने यांच्या मार्गदर्शनाखाली व तत्कालीन क्षेत्रीय अधिकारी जिल्हा कृषी अधीक्षक उज्वला बाणखेले, उपविभागीय कृषी अधिकारी महाड बालाजी ताटे, तत्कालीन तालुका कृषी अधिकारी पोलादपूर सुरज पाटील, कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे, कृषी सहायक देवपुर मनोज जाधव यांच्या तांत्रिक मार्गदर्शन व जनजागृतीमुळे गोळेगणी गावांतील नामदेव येरुणकर, गणपत पवार, शेखर येरुणकर, अविनाश येरुणकर, प्रकाश येरुणकर, दीपक मोरे, ज्ञानेश्वर मोरे, राजेंद्र दळवी, अनिकेत मोरे, सागर मोरे, विमल मोरे, मंदा सुर्वे, मधुकर मोरे, बाळकृष्ण मोरे, दशरथ मोरे, दीपक मोरे नितीन मोरे, दिपक कदम, रामदास मोरे, तुटवली, गणेश मोरे, राजाराम शिंदे, मोरगिरी, दगडू ढेबे, मोरगिरी, असे शेतकऱ्यांच्या स्वयंप्रेरणेने २२ जलकुंडांचे काम पूर्ण करण्यात आले.

कोकणातील जमीनधारणा क्षेत्र सरासरी एक हेक्टरपेक्षा कमी आहे. कोकण विभागात सरासरी पर्जन्यमान ३५०० ते ४००० मिमी असून कोकण विभागातील हवामान आंबा, काजू व इतर फळपिकास पोषक आहे. कोकण विभागात दरवर्षी विविध शासकीय योजना, सामाजिक संस्था तसेच वैयक्तिक शेतकरी यांच्याकडून आंबा व काजू या फळपिकांची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात येत असुन फळबागा जिवंत राहण्याचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. याचे प्रमुख कारण म्हणजे कोकणातील जमिनी डोंगर उताराच्या व कातळ भाग असल्यामुळे लागवडीनंतर सुरवातीच्या तीन वर्षाच्या कलमे रोपांना डिसेंबर ते मे या महिन्यांच्या कालावधीत संरक्षित पाणी देण्याची सुविधा पुरेशा नसल्याचे दिसून येते. शेततळ्याचे आकारमान तसेच त्याकरीता येणारा खर्च या बाबींचा विचार करता कोकणातील दुर्गम व डोंगराळ,कातळ भागात शेततळे खोदणे शक्य नाही अशा जागेवर हा जलकुंड उपचार फायदेशीर असून पाच मी. लांब, पाच मी. रूंद आणि दोन मी. खोल आकारमानाचे जलकुंड कोकणातील सर्वसामान्य फळबाग शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली यांनी कोकणातील फलोत्पादन पिकासाठी जलकुंड या उपचारास तांत्रिक शिफारस केलेली असून या अनुषंगाने मृद व जलसंधारण संचालक यांच्याकडून शासनास सादर केलेल्या जलकुंड प्रस्तावास मृद व जलसंधारण विभागाच्या २७ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये कोकण विभागासाठी डोंगराळ भाग कातळामध्ये यंत्राद्वारे जलकुंडाचे काम करण्याचे मापदंड मंजुर केलेले आहेत. याबाबतचे अधिकृत परिपत्रक ३ जानेवारी २०२५ रोजी राज्य सरकारच्या कृषी आयुक्तालयाने जारी केले असल्याने कोकणातील पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या पाचही जिल्ह्यांमध्ये जलकुंड निर्मितीस राज्यसरकारचे प्रोत्साहन मिळणार आहे. यासाठी जिल्हा नियोजन मंडळ, मनरेगा असे पर्याय उपलब्ध असून जलकुंड निर्मितीसाठी गोळेगणी गांव ज्यांच्या विधानसभा मतदारसंघामध्ये आहे; त्या रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले यांनी शेतकऱ्यांना रोहयोतून जलकुंड निर्मितीसाठी भरघोस प्रोत्साहन दिल्यास शेतकऱ्यांचे कल्याण साधले जाणार आहे. पोलादपूरचा हा जलकुंड पॅटर्न यशस्वी झाल्याने कोकणातील पाच जिल्ह्यांसाठी वरदान ठरणार आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# इन्टाग्रामवर रील्स पाहण्याचे व्यसन? काळजी घ्या...

इन्स्टाग्राम रील्स स्क्रोल करणं, सोशल मीडियावर मीम्स शेअर करणं, सोशल प्रोफाइल अपडेट आणि रील-लाइफची वास्तविक जीवनाशी तुलना करणं आता सामान्य झालं आहे. सोशल मीडियाचा वापर झपाट्याने वाढला आहे, ज्यामुळे आपल्या जीवनावर सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही परिणाम होतात. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे.



बस, ट्रेन, मेट्रो, घरात, कुटुंबात किंवा आपल्या आजूबाजूला असलेल्या लोकांना एक सामान्य सवय असते ती म्हणजे प्रत्येकजण त्यांच्या फोनमध्ये व्यस्त असतो. तासन्तास फोन स्क्रोल करण्याची आणि इन्स्टा रील्स पाहण्याची सवय आजकाल लोकांना इतकी जडली आहे की, त्याचा थेट परिणाम त्यांच्या आरोग्यावर होत आहे.

'या' आजारांचा धोका

ज्या लोकांना फोन पाहण्याची जास्त सवय आहे त्यांनी झोप न लागणे, डोकेदुखी, मायग्रेन इत्यादी समस्यांचा सामना करावा लागतो. जर तुम्ही झोपत असाल तर तुम्हाला रीलबाबतची स्वप्नं पडतील. रील पाहण्याची ही सवय केवळ तरुणांमध्येच दिसून येत नाही तर १० ते ५५ वयोगटातील लोकांमध्येही दिसून येते, ज्यामुळे मानसिक आजार दिवसेंदिवस वाढत आहेत.

रील्स पाहण्याचे तोटे

सुरुवातीच्या तपासणीदरम्यान लोकांनी सांगितलं की, ते सुमारे दीड वर्षांपासून रील पाहत आहेत, ज्यामध्ये ते सकाळी उठल्याबरोबर रील पाहण्यास सुरुवात करतात आणि रात्रीपर्यंत रील पाहत राहतात. त्याचवेळी काही लोकांनी त्यांना व्हॉट्सअॅपवर शेअर केलेले रील्स पाहणं आवडतं असं म्हटलं आहे. जर ते रील पाहत नसतील तर त्यांना विचित्र वाटू लागतं.

'या' समस्यांचा करावा लागेल सामना : डोळे खूप दुखतात. तीव्र डोकेदुखी. झोप न येणे. जेवणाच्या वेळा न पाळणे. रील्स पाहण्याचे व्यसन एखाद्या आजारापेक्षा कमी नाही.

असं करा स्वतःचं रक्षण : जर तुम्हाला या आजारापासून दूर राहायचे असेल तर दररोज कमी रील्स पाहण्याचा प्रयत्न करा. गरज असेल तेव्हाच फक्त मोबाईलचा वापर करा. विविध पुस्तकं वाचायला सुरुवात करा. मित्र आणि कुटुंबासोबत जास्त वेळ घालवा. वेळ असेल तेव्हा मोकळ्या हवेत फिरायला जा.

# स्त्री हक्क पुरस्कर्त्या रमाबाई रानडे



**निमित्त**

भारतभूमीला जसे अनेक संत लाभले; त्याचप्रमाणे थोर समाजसेवकही लाभले. काहींनी भारताला स्वातंत्र मिळावे म्हणून अथांग प्रयत्न केले. तर काही समाजसुधारकांनी भारतात चालत असलेल्या कृप्रथा बंद व्हाव्या म्हणून शेवटच्या श्वासापर्यंत प्रयत्न केले.


स्वतंत्रपूर्वीचा काळ असा होता की त्या वेळेला स्त्रीला उंबरठा ओलांडून जाण्याची परवानगी न्हवती तसेच सती जाणे, केशवपन, बालविवाह यांसारख्या भयानक प्रथांना स्त्रीला सामोरे जावे लागत होते. अशाच वेळी काही महिला समाजसुधारकांनी या भारत भूमीमध्ये जन्म घेतला व समाजातील स्त्रीला साक्षर बनवण्याचा प्रयत्न केला. सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, आनंदीबाई जोशी, रमाबाई रानडे, बहिणाबाई चौधरी यांसारख्या अनेक स्त्री समाजसुधारकांचे अनमोल योगदान भारतभूमीला लाभले.

भारतवर्षातील एक थोर स्त्री समाजसुधारक होत्या रमाबाई रानडे. महिलांना त्यांचे अधिकार मिळावे, महिलांनी शिक्षण घ्यावे याकरितादेखील रमाबाई रानडेंनी अथांग प्रयत्न केले. रमाबाई रानडे या सेवा सदन संस्थापक आणि अध्यक्ष होत्या. या संस्थानात हळूहळू अनेक महिलांनी भाग घेतला.

अशा या समाजसेविका रमाबाई रानडे यांचा जन्म २५ जानेवारी १८६३ रोजी कुरलेकर कुटुंबात झाला. एक भारतीय समाजसेवी म्हणून आणि १९व्या शतकात पहली महिला अधिकार कार्यकर्ता म्हणून त्यांनी काम पाहिले. वयाच्या ११ वर्षी त्यांचा विवाह महादेव गोविंद रानडे यांच्यासोबत झाला होता, जे एक प्रतिष्ठित विद्वान आणि समाजसुधारक होते. महादेवरावांनी लहानशा रमाबाईंना समजून घेतले व त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत त्यांना साक्षर केले तसेच महादेवरावांनी रमाबाईंना मराठीचे ज्ञान देत इंग्रजी आणि बंगालीमध्ये मास्टरी मिळवण्यासाठी अथांग मेहनत घेतली. महादेवराव रमाबाईंच्या पाठीशी कायम उभे राहिले, पण एवढे सोपे नव्हते त्या वेळी स्त्रीला घराबाहेर पडून शिक्षण घेणे. अनेक संकटांचा सामना करीत रमाबाई शिकल्या. महादेवरावांची सुंदर विचारधारा, प्रगतशील दृष्टी, भावनिकता आणि समर्पित सामाजिक प्रतिबद्धता तसेच देशाबद्दलचे प्रेम याने रमाबाई यांना प्रेरणा मिळाली व भविष्यात समाजसेविका बनण्यासाठी समाजासाठी कार्य करण्याची त्यांना प्रेरणा मिळाली.

थोर समाजसेविका रमाबाई रानडे या पहिल्यांदाच नाशिकमधील शाळेमध्ये प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिल्या होत्या तसेच महादेवरावांनी त्यांना भाषण लिहून दिले होते. रमाबाई लहानपणा पासूनच हुशार होत्या त्यामुळे त्यांनी बंगाली आणि इंग्रजी भाषा लागलीच आत्मसात केली. तसेच रमाबाई भाषण करायच्या तेव्हा ऐकणारा भारावून जायचा. नंतर त्यांनी मुंबईत प्रार्थना समाजासाठी काम करायला सुरुवात केली. नंतर त्यांना आर्य महिला सामाज्याच्या एका शाखेची स्थापना करीत १८९३ ते १९०१ सामाजिक कार्य करीत लोकप्रियता मिळवली तसेच यांनी महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी वर्ग उघडले. त्यामध्ये भाषा ज्ञान, शिवणकाम यांसारखे अनेक कामांचे प्रशिक्षण दिले जाऊ लागले, ज्यामुळे महिला सक्षम बनू लागल्या. **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# घरच्या घरी अशा प्रकारे बनवा स्वस्त हेअर जेल

केस लांब आणि दाट करण्यासाठी लोकं नेहमी वेगवेगळे उपाय करत असतात, त्यासाठी अनेकजण वेगवेगळ्या प्रकारचे हेअर ट्रीटमेंट आणि उपायांचा अवलंब करतात. शॅम्पू, हेअर कंडिशनर, मास्क आणि जेल सारख्या उत्पादनांचा देखील वापर करतात. अशातच इतर उपाय करण्याऐवजी तुम्ही घरात उपलब्ध असलेल्या वस्तूं पासून हेअर जेल बनवून केसांना लावल्यास केस निरोगी आणि चमकदार ठेवण्यास मदत करू शकतात.



बाजारात तुम्हाला अनेक प्रकारचे हेअर जेल पाहायला मिळतील. याचबरोबर तुम्ही नैसर्गिक घटकांचा वापर करून घरी हेअर जेल देखील बनवू शकता जे तुमचे केस नैसर्गिक पद्धतीने निरोगी, मऊ आणि चमकदार ठेवण्यास मदत करतात.

फ्लॅक्स सीड्समध्ये व्हिटॅमिन सी, प्रथिने, व्हिटॅमिन बी ६, मॅग्नेशियम आणि आरोग्यासाठी तसेच केस आणि त्वचेसाठी फायदेशीर असलेले विविध पोषक असतात. फ्लॅक्स सीड्सचा वापर करून तुम्ही हेअर मास्क बनवू शकता. यासाठी तुम्हाला एका पॅनमध्ये दोन चमचे फ्लॅक्स सीड्स घालून कमी आचेवर पाणी जेलमध्ये रूपांतरित होईपर्यंत शिजवावे. त्यानंतर थंड होऊ द्या. आता ताज्या कोरफड जेल आणि नारळात मिसळा आणि शॅम्पू करण्यापूर्वी २५ ते ३० मिनिटे केसांना लावा.

काकडी आणि कोरफडपासून तुम्ही जेल बनवू शकता. यासाठी काकडी सोलून किसून घ्यावी. नंतर दोन चमचे कोरफड जेल मिसळून पेस्ट तयार करा. २० ते ३० मिनिटे केसांना लावा. त्यानंतर शॅम्पूने केस धुवून घ्या. यामुळे कोरडेपणा आणि खाज सुटणे यासारख्या समस्या कमी होण्यास मदत होते.

शिया बटर केस मऊ बनविण्यातदेखील मदत करू शकते. एक चमचा कोरफड जेलमध्ये एक चमचा शिया बटर मिसळून तुम्ही हेअर जेल तयार करू शकता. हे केसांना हायड्रेट करण्यासाठी आणि चमक वाढविण्यासाठी फायदेशीर ठरू शकते.

चिया बियाणे आरोग्य, त्वचा आणि केसांसाठी देखील फायदेशीर ठरू शकते. चिया बियाणे थोड्या पाण्यात थोडा वेळ भिजत ठेवा. त्याचा आकार बदलल्यानंतर एका बाऊलमध्ये ठेवून त्यात दोन चमचे कोरफड जेल मिसळा. जर पेस्ट खूप जाड झाली तर तुम्ही त्यात थोडे पाणी घालू पातळ करू शकता. आता हा हेअर मास्क केसांना २० ते २५ मिनिटे लावा आणि नंतर केस धुवा.

## निवडक

### स्व. बाळासाहेब ठाकरे यांची जयंती



**मुरुड :** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती शिवसेनेकडून साजरी करण्यात आली. भंडारी बोर्डिंगमधील हॉलमध्ये या वेळी बाळासाहेब ठाकरे यांच्या फोटोस पुष्पमाला अर्पण करण्यात आली. या वेळी शिवसेना रायगड जिल्हा उपाध्यक्ष भरत बेलोसे, तालुका प्रमुख रुशिकांत डोंगरीकर, शहर अध्यक्ष संदीप पाटील, प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे, सागर चौलकर, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, वीरेंद्र भगत, तालुका संघटक यशवंत पाटील, अरविंद गायकर, नैनिता कर्णिक, माजी सैनिक अजित कारभारी, मनोज कमाने, माजी नगरसेविका युगा ठाकूर आदी उपस्थित होते.

### मांडला येथे आपत्ती अनुदान वाटप



**रेवदंडा :** मुरुड तालुक्यातील मांडला येथील सुदर्शन सहकारी भात गिरण व भात खरेदी विक्री संघाच्या उपक्रमाने आपत्ती अनुदान वाटप कार्यक्रम नुकताच झाला. सुदर्शन सहकारी भात गिरण व भात खरेदी विक्री संघ मांडलाचे चेअरमन शशिकांत पारवे यांचे अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहूणे सहाय्यक निंबधक सहकारी संस्था मुरूडचे निलेश शिंदे यांचे उपस्थितीत कार्यक्रम झाला. या वेळी व्हाईस चेअरमन रफायल वेगस, सदस्य चंद्रकांत चोगले, सदस्य संतोष कांबळी, प्रदीप धनावडे, लक्ष्मी थळे, जाकीर अली हमदुले, फैयाज हुसेन दळवी, निस्सार नाईक, पुरूषोत्तम थळे, अरूण गुरव आदी उपस्थित होते.

### सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी

**रेवदंडा :** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम तथा क्रीडा मंत्रालय संचालित नेहरू युवा केंद्र, रायगड-अलिबाग आणि ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था, रेवदंडा-अलिबाग, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने वरसई येथील शैक्षणिक संकुलात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्ताने प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रतिक कोळी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवकार्यावर प्रकाश टाकला. या वेळी वरसई येथील शैक्षणिक संकुलाचे प्रमुख प्रा. जानकर, करंजीकर, युवा सामाजिक कार्यकर्ते सुचित जावरे, दर्ष नागोटकर आदी उपस्थित होते.



# कृती आराखडा प्रभावीपणे राबवावा -गोविंदाराज



**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी कृती आराखड्यानुसार प्रभावी कार्यवाही करावी, अशा सूचना आज पालक सचिव तथा नगर विकास प्रधान सचिव के एच गोविंदाराज यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात शासनाच्या सर्व विभागाच्या १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. प्रधान सचिव गोविंदराज हे दूरदृश्यप्रणाली द्वारे या बैठकीस उपस्थित होते.

या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी डॉ भरत बास्टेवाड, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के,प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे, उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे, डॉ रविंद्र शेळके यांसह सर्व कार्यालय विभाग प्रमुख उपस्थित होते.

या वेळी श्री गोविंदाराज विभागातील सर्व कार्यालयांनी आपल्या संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत ठेवावी. कार्यालयाचे संकेतस्थळ हाताळण्यास सुलभ असावे. संकेतस्थळावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, मधील तरतुदींनुसार जास्तीत जास्त माहितीचे स्वयंप्रकटीकरण गरजेचे आहे. वेबसाईटच्या माध्यमातून नागरिकांना सेवा उपलब्ध होईल याबाबत काळजी घ्यावी. तसेच नागरिकांना मिळणाऱ्या सेवा जास्तीत जास्त सुलभ करण्याच्या दृष्टीने प्रचलित कामकाजाच्या पद्धतींचे पुनर्विलोकन करुन प्रशासकीय कार्यपद्धतीमध्ये किमान दोन सेवा अतिशय सुलभ पध्दतीने द्याव्यात. नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे याकरीता सातत्याने विभागाकडून प्रयत्न गरजेचे असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

आपल्या कार्यालयात स्वचछता राहील, याची प्रत्येकाने दक्षता घ्यावी. सर्व अभिलेखांचे शासन निर्णयाप्रमाणे वर्गीकरण करा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. नागरिकांकडून कार्यालयास प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचे (आपले सरकार, पीजी पोर्टल) तत्परतेने निपटारा करण्यात यावा. गुंतवणूकदार, उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे व पोषक वातावरण निर्माण व्हावे आणि गुंतवणूक वाढावी याकरीता सामूहिक प्रयत्न करावेत असे निर्देशही त्यांनी यंत्रणेला दिले.

रायगड जिल्हा प्रशासनाने १०० दिवस आराखडा अतिशय सूक्ष्म नियोजन करून तयार केला आहे. सर्व यंत्रणा परस्पर समन्वयाने प्रभावी काम करीत असल्याबद्दल श्री गोविंदाराज यांनी यंत्रणेचे कौतुक करून रायगड जिल्हा या अंमलबजावणीमध्ये राज्यात अग्रेसर राहावा यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असेही त्यांनी या वेळी सांगितले.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जिल्हा प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीचे सविस्तर सादरीकरण केले. रायगड जिल्हा सुशासनात राज्यात पहिला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच सेवा हमी कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये रायगड जिल्ह्याचे ९२.५ टक्के काम असल्याचे सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ भरत बास्टेवाड यांनी जिल्हा परिषदेच्या नियोजनाची माहिती सादर केली.

पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे यांनी पनवेल महानगरपालिकेमार्फत नागरिकांना देण्यात येणाऱ्या सुविधांची, उपक्रम यांची माहिती सादर केली.

# पनवेल महानगरपालिका कर्तव्याची सप्तपदी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची धुरा स्वीकारल्यानंतर राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी जोरदारपणे मोहिम राबविली आहे. याचाच एक भाग म्हणजे १०० दिवसांकरिता सात कलमी कृती कार्यक्रम संपुर्ण राज्यात प्रशासनाने राबवावा याकरिता निर्देश दिले आहेत. पनवेल महापालिमार्फतही याची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणात सुरू आहे. आयुक्त मंगेश चितळे आणि सर्व वरिष्ठ अधिकारी याबाबत दक्ष आहेत. त्याविषयीचा हा थोडक्यात लेख.



राज्यातील जनतेचे जीवनमान सुकर व्हावे याकरिता राज्य शासन सदैव प्रयत्नशील आहे. त्याकरिता मुख्यमंत्री महोदयांनी एक विशेष उपक्रम राज्यातील सर्व कार्यालयात राबविण्याचे निर्देश दिले आहेत. यामध्ये संकेतस्थळ, सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयातील सोयी व सुविधा, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी अशा मुद्दांचा समावेश आहे. सदैव जनताभिमुख असलेल्या महानगरपालिका प्रशासनातही याची प्रभावी अंमलबजावणी करिता पालिकेच्या सर्व घटकांनी प्रभावी कार्यवाही करावी असे निर्देश देऊन आयुक्तांनी विकासाची सप्तपदी राबविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

**संकेतस्थळ (वेबसाईट) :-** सर्व कार्यालयांनी आपल्या संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत ठेवावी. कार्यालयाचे संकेतस्थळ हाताळण्यास सुलभ (Easy-to-navigate) असावे. संकेतस्थळावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार झीरलींर्ळीश उ्ळीलश्रींीशी या शीर्षकाखाली जास्तीत जास्त माहितीचे स्वयंप्रकटीकरण करण्यात यावे. वेबसाईटच्या माध्यमातून नागरिकांना सेवा उपलब्ध होईल यादृष्टीने वेबसाईट खपींशीरलींर्ळीश राहील, अशा सूचना आहेत. त्यानूसार महापालिकेने आपले संकेतस्थळ अद्ययावत करण्याचे सुरू केले आहे. संकेतस्थळाच्या माध्यमातून नागरिकांना सेवा उपलब्ध होईल यादृष्टीने पालिकेच्यावतीने सुमारे १३ विविध सेवा देण्यात येत आहे.तसेच डाटा सुरक्षिततेसाठी आवश्यक ती दक्षता घेण्यात येत आहे.महापालिकेचे संकेतस्थळ अद्ययावत ठेवतानाच संकेतस्थळाच्या सुरक्षेबाबत (सायबर सुक्युरिटी) आवश्यक दक्षता घेण्याच्या दृष्टीने सायबर लेखापरिक्षण करण्यात आले आहे.तसेच येत्या काही दिवसांत नागरिकांना सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने विशेष ॲप लॉन्च करण्यात येणार आहे. या ॲपमध्ये सोशल मिडीया, नागरिकांच्या तक्रारी, कॉल सेंटर, मोबाईल ॲप, सिटीझन एगेंजमेंट अशा विविध गोष्टीचा समावेश करण्यात आला आहे.

**सुकर जीवनमान** (Ease of Living): नागरिकांना मिळणाऱ्या सेवा जास्तीत जास्त सुलभ करण्याच्या दृष्टीने प्रचलित कामकाजाच्या पद्धतींचे पुनर्विलोकन करुन प्रशासकीय कार्यपद्धतीमध्ये किमान दोन सेवा अतिशय सुलभ पध्दतीने द्याव्यात. नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे याकरीता सातत्याने प्रयत्न करावेत, असे सात कलमी कार्यक्रमांमध्ये नमूद करण्यात आले आहे. त्याकरिता मनपा प्रशासनाने प्रयत्न सुरू केले आहेत. लवकरच त्याबाबत सविस्तर अंमलबजावणी धोरण ठरविण्यात येत आहे.

पनवेल महानगरपालिकेमार्फत पालिका हद्दीमध्ये पनवेल महानगरपालिका परवाना विभागाकरीता व्यावसायिक मालमत्तांचे सर्वेक्षण नोंदणीकरण, परवाना नुतनीकरण, परवाना संबंधीत अनुषंगीक काम स्वारस्य अभिव्यक्ती (एजख) पध्दतीने करुन नवीन व्यवसाय परवाने देणे व नुतनीकरण करणे तसेच परवाना विभागाकडील व्यवसाय परवाने व ग्लो साईन बोर्ड ऑनलाईन परवाना देणेसाठी http://tradepanvelmc.org ही वेबसाईट तयार करण्यात आलेली असुन, सदरची वेबसाईट नागरीकांच्या सेवार्थ सुरू केले आहे.

**स्वच्छता** (Cleanliness):- प्रचलित नियम, कार्यपद्धतीप्रमाणे शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये निंदणीकरण, नष्टीकरण व निर्लेखनाची प्रक्रिया प्राधान्याने व निरंतरपणे राबविण्यात यावी. याअंतर्गत कार्यालयांमधील अभिलेख निंदणीकरण करुन तपासाअंती आवश्यक नसल्यास नष्ट करण्यात यावेत. ज्यायोगे आपले कार्यालय स्वच्छ व नेटके राहील याची दक्षता घ्यावी. महापालिकेच्या मुख्यालयात स्वच्छता मोहीम घेऊन तेथील खुप दिवसांपासुन पडून असलेले व वापरात नसलेले कपाटे, खुर्च्या फर्निचर इत्यादी साहित्य निष्कासित करण्यात आले आहे. तसेच प्रभाग समिती -कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या स्वच्छता मोहीमेमध्ये अनावश्यक वस्तू कमी करण्यात येत आहेत. एकुणच महापालिकेची सर्व कार्यालये अधिक स्वच्छ करण्यात येत आहेत तसेच पनवेल महानगरपालिका पमपा शिक्षण विभागातंर्गत असणाऱ्या पमपाच्या १० शाळांमधून मा. मुख्यमंत्री क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांच्या कृती कार्यक्रम निर्देशानुसार शाळा परिसर, वर्ग खोल्या, प्रसाधनगृह स्वच्छता तसेच जन जागृती प्रभात फेरी, स्वच्छतेचे महत्व, चित्रकला स्पर्धा रांगोळी स्पर्धा इत्यादी स्वच्छता मोहिम कृती कार्यक्रम पुढील प्रमाणे राबविण्यात आले.

**जनतेच्या तक्रारींचे निवारण** (Grievance Redressal):- नागरिकांकडून कार्यालयास प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचे (आपले सरकार, P.G. Portal, यांसह) त्वरेने निराकरण करण्यात यावे व १ जानेवारी २०२५ पूर्वीची प्रलंबितता शून्य करावी. सर्व अधिकाऱ्यांनी कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतांच्या भेटीसाठी आठवड्यातील दैनंदिन वेळ राखून ठेवावी व तसे फलक कार्यालयामध्ये दर्शनी भागात लावण्यात यावेत. दौऱ्यावर असल्यास अभ्यागतांना भेट देण्यासाठी अन्य अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. या संदर्भात कार्यवाही सूरू आहे.

**कार्यालयातील सोयी व सुविधा** (Amenities at work place):- कार्यालयांत येणारे अभ्यागत यांच्याकरिता पिण्याच्या पाण्याची योग्य व कायमस्वरुपी व्यवस्था असावी. अभ्यागत यांच्यासाठी कार्यालयाच्या आवारातील प्रसाधनगृहे स्वच्छ ठेवण्यात यावीत. तसेच प्रसाधनगृह नादुरूस्त असल्यास आवश्यक ती दुरुस्ती तातडीने करावी. कार्यालयांमध्ये येणाऱ्या अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय असावे. कार्यालयांमध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक असावेत. कार्यालयांमधील वातावरण प्रसन्न व आल्हाददायक राहील याकरिता विशेष प्रयत्न करून कार्यालयाचे व परिसराचे सौंदर्यीकरण करण्यात यावे. यासाठी अधिक दक्षता घेऊन कार्यवाही करण्यात येत आहे.

**क्षेत्रीय कार्यालयांना भेटी** (Field visits):- आठवड्यातून किमान दोन दिवस अधिकाऱ्यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देवून पाहणी करावी. प्रगतीची पाहणी करुन त्याचे पर्यवेक्षण करावे. क्षेत्रीय भेटीदरम्यान महत्त्वाचे घटक असणाऱ्या शाळा, प्रभाग कार्यालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र यांना भेटी देवून त्यांच्या कामकाजावर देखरेख ठेवावी. प्रभाग स्तरावरील कर्मचाऱ्यांचे अनुभव, त्यांना येणाऱ्या अडचणी व त्यांनी मांडलेल्या सूचना गांभीर्याने घेवून त्यावर तात्काळ योग्य ती कार्यवाही राबविण्यात येत आहे. हा १०० दिवसांचा ७ कलमी कृती आराखडा १५ एप्रिल २०२५ पर्यंत महापालिकेत यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. एकुणच अशा प्रकारच्या उपक्रमांनी, मोहिमांनी महापालिका व जनता नागरिक यांच्यात सुसंवाद साधला जाईल अशी आशा आहे.

**-वर्षा कुलकर्णी**
**जनसंपर्क अधिकारी,**
**पनवेल महानगरपालिका**

## कोकण विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची बैठक

**रायगड :** कोकण विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची बैठक ३० जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालय, कोंकण भवन, सीबीडी बेलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे. असे अपर आयुक्त तथा सदस्य सचिव, विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती, कोकण विभाग डॉ. नितिन महाजन यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

ता. राहाता, जि. अहिल्यानगर, महाराष्ट्र पिन ४२३१०९ फोन नं. (०२४२३)- २५८५०० संकेतस्थळ : www.sai.org.in,

**जाहिरात**

श्री साईबाबा संस्थान संचालित साईबाबा हॉस्पीटलसाठी ४१ व साईनाथ रूग्णालयासाठी-०७ वैद्यकीय अधिकारी यांची विविध आवश्यक एकुण ४८ रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत त्यासाठी अर्ज सादर करणेची मुदत दि.३१/०१/२०२५ अखेर सायं. ५ वाजेपर्यंत वाढविणेत येत आहे. सविस्तर जाहिरात संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in वर उपलब्ध आहे.

सही/-
गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,

MAHATRANSCO

**E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tender -35 **(RFX.7000033642)** | RFx e-tender for work of providing & fixing of EPR High voltage insulation tape at various substations under EHV (O&M) Division Panvel …**3rd call.** (Tender Fee Rs. 500/- + 18% GST) | **Rs. 5,63,623/-** |
| Tender -37 **(RFX.7000034401)** | RFx e-tender for work of repairing of 22/33kV Current Transformer/ Potential Transformer at various substations under EHV (O&M) Division Panvel….**2nd call.** **(Tender Fee Rs.** 500/- + **18% GST)** | **Limited to Rs.7,50,000/-** |
| Tender -39 **(RFX.7000034481)** | RFx E-tender for Work of providing of earthwire at missing earthwire span without block /outage with the use of special T&P like Tension & Puller machine at various locations of 220kV & 100kV Lines under EHV Line S/Dn. Panvel - I & II under EHV (O&M) Division Panvel…. 2nd call. **(Tender Fee Rs.** 500/- + **18% GST)** | **Rs.21,48,860/-** |

EMD 1% of estimated cost for each Tender. **Submission of bids from 27.01.2025 to 06.02.2025 up to 10:59 hrs, Opening date:-06.02.2025 @ 11:00 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The ADDL. Executive Engineer (O) Tel No. 022-27465410, Mob. No. 8530095666 E-mail ID ee7210@mahatransco.in

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER EHV(O&M) DN PANVEL**

महावितरण

**निविदा सूचना**

**पात्र असणाऱ्या निविदाकारांची निविदा खालील कामासाठी मागविण्यात येत आहे.**

| निविदा क्र./निविदा रक्कम/निविदा प्रपत्र विषय | निविदा उघडण्याची तारीख | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|
| **अअ/वामं/तां.वि./नि-२१/२०२४-२५/रु. १०००/-** वाशी मंडळ, भांडुप परिमंडळ अंतर्गत नेरूळ, वाशी आणि पनवेल शहरी विभागांतर्गत सन-स्टेशनच्या ब्रेकडाउन देखभालसाठी एजन्सीजचे पॅनेलमेंट करणे. | २०.०१.२०२५ | १०.०२.२०२५ |

महावितरणच्या संकेत स्थळावर **(www.mahadiscom.in)** सदर निविदाचे प्रपत्र **दि. २०.०१.२०२५** पासून उपलब्ध आहे. सदर निविदा **ई-टेंडरिंग पध्दतीने** (ऑनलाईन) **दि. १०.०२.२०२५ रोजी २३:५५ पर्यंत** स्विकारण्यात येतील. अधिक माहितीसाठी कार्यकारी अभियंता (प्र), महावितरण, वाशी मंडळ, वाशी यांच्याशी ८८७९६२५०१२ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

**अधिक्षक अभियंता (वामं)**

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

जा.क्र पमपा/जनसंपर्क/ ३१२५/प्र.क्र.२७/२७/२०२५ दिनांक : २४/०१/२०२५

| अ.क्र | कामाचे नाव | निविदा क्र. | दिलेल्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग (अ) मधील विविध उद्यानांमध्ये लॉन लावणे व ३ वर्षाकरीता देखभाल करणे. | PMC/ Garden/03/ 2024-25 | रु. ४,००,३६,२४१/- (GST विरहित) | ४,००,३६२/ | ३६ महिने |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २५/०१/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(डॉ. प्रशांत रसाळ)**
**अतिरिक्त आयुक्त-I,**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

**जाहीर निविदा**

दि. २४/०१/२०२५

**ग्रुप ग्रामपंचायत जांबरुंग ता.खालापूर, जि. रायगड**

सर्व बांधकाम ठेकेदार यांस जाहीर निविदाद्वारे कळविण्यात येते कि, ग्रामपंचायत जांबरुंग ता. खालापूर जि. रायगड यांजकडून ग्रामपंचायत १५वा वित्त आयोग योजनेतून कामाच्या अनुभवी इच्छुक जीएसटी धारक व गव्हरमेंट रजिस्टर ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ज्या ठेकेदारांना सदरची कामे करावयाची आहेत त्यांनी आपली निविदा दि. २५/०१/२०२५ पासून ते दि ३०/०१/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावी. व सदर निविदा दि. ३१/०१/२०२५ रोजी ठीक दुपारी ठीक ११.३० वा.मा. सरपंच, सदस्य, ठेकेदार यांच्या उपस्थितीत समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अगर सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | योजनेचे नाव | निविदा फी | इसारा रक्कम | काम पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या कचरा कुंडीतील कचऱ्याची विल्हेवाट लावणे | ५००००/- | १५वा वित्त आयोग अंतगर्त सन २०२४-२५ बंधित | १०० | ५०० | ६ महिने |
| २ | शंकर वाळकू पिंगळे, कमोद दत्तू तांडेल यांना नळ कनेक्शन देणे. | ४७७४२/- | १५वा वित्त आयोग अंतगर्त सन २०२४-२५ बंधित | १०० | ४७७ | ६ महिने |
| ३ | जांबरुंग येथे बोरवेल मारणे | ६१०३४/- | १५वा वित्त आयोग अंतगर्त सन २०२४-२५ बंधित | १०० | ६१० | ६ महिने |
| ४ | ग्रामपंचायत कार्यालय दुरुस्ती सुशोभीकरण विस्तार व फर्निचर करणे खरेदी करणे | १८१२००/- | १५ वा वित्त आयोग अंतगर्त सन २०२४-२५ अबंधित | १०० | १८१२ | ६ महिने |

१) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत ग्रा. पं. मध्ये पहावयास मिळतील.
२) प्राप्त निविदा व दरपत्रक दि. ३१/०१/२०२५ रोजी दुपारी ठीक ११.३० वा. ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात जांबरुंग येथे मा. सरपंच यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
३) नोंदणीकृत ठेकेदारांना प्राधान्य देण्यात येईल. निविदाधारकाने निविदा सादर करताना जीएसटी नंबर आधार कार्ड पॅन कार्डची झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे.
४) प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणे करांची रक्कम कपात केली जाईल.
५) सदरची कामे अंदाजपत्रकाप्रमाणे मा. गटविकास अधिकारी पंचायत समिती खालापूर व उपअभियंता सो. खालापूर यांजकडील तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली करावयाची असून काम समाधानकारक नसेल तर ते काम त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करण्याचा अधिकार ग्रा.प. ने राखून ठेवले आहेत.
६) कोणतीही एक अथवा सर्व निविदा व दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच ग्रुप ग्रामपंचायत जांबरुंग यांस राहील.
७) सविस्तर अटी व शर्तीकरीता ग्रामपंचायत कार्यालयाकडे संपर्क साधावा.

**सही/-**
**संतोष भैरव पवार**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत जांबरुंग**

**सही/-**
**शिल्पा प्रशांत खांडेकर**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत जांबरुंग**

# मोरा ते मुंबई रो-रो पुढील वर्षात कार्यान्वित

## अनेक महिने बंद असलेले काम पुन्हा सुरू

**उरण : रामप्रहर वृत्त**

मोरा ते मुंबईदरम्यान रो-रो सेवेसाठी जेट्टी उभारण्याचे काम २०१८ सालापासून रखडले आहे. त्यानंतर जेट्टीचे काम अनेक महिने बंद होते. या कामाला पुन्हा एकदा सुरुवात झाली असून मार्च २०२६ पर्यंत हे काम पूर्ण होणार असल्याचा दावा महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी केला आहे. त्यामुळे या नव्या मुहूर्तावर तरी ही सेवा सुरू का, असा सवाल केला जात आहे.

विलंबामुळे या जलमार्गाच्या कामाच्या खर्चात वाढ झाली आहे. यातील रेवस जेट्टीच्या कामात पाच कोटींच्या खर्चात वाढ झाली आहे. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या माध्यमातून या जेट्टीचे काम करण्यात येत आहे. या जेट्टीचे काम पूर्ण होण्यासाठी आणखी काही महिने लागण्याची शक्यता आहे. मोरा ते मुंबईतील भाऊचा धक्का या



रो-रो मार्गावरील भाऊचा धक्का ही जेट्टी कार्यान्वित झाली आहे.

मोरा जेट्टीचे काम सहा वर्षांपासून रखडले आहे. हे काम रखल्याने ५० कोटींच्या कामाची रक्कम ७५ कोटींवर पोहचली आहे. तरीही जेट्टीचे काम अपूर्णच असून जेट्टीपर्यंत जाण्यासाठी मार्गही होऊ शकलेला नाही. उरण हा समुद्र आणि खाडी मार्गाने मुंबई आणि अलिबाग यांना जोडता यावा यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून जलसेवा सुरू आहे, मात्र या मार्गाने वाहन घेऊन प्रवास करता यावा याकरिता रो-रो सेवा सुरू करण्याचा मानस आहे. हे काम वारंवार बंद होऊन रखडले आहे. त्यामुळे हे काम पूर्ण होणार का असा सवाल आता या मार्गावरील प्रवासी करू लागले आहेत.

मोरा-मुंबई व अलिबाग आणि उरणला जोडणाऱ्या रेवस ते करंजा मार्गावरील रो-रो सेवा खरंच सुरू होणार का अशी शंका व्यक्त केली जात आहे. याचे मुख्य कारण म्हणजे उरणला मुंबईशी जोडणाऱ्या अटल सेतूमुळे मुंबईत वाहने घेऊन जाणारे या सेतूचा वापर करू लागले आहेत. त्यामुळे या जल मार्गावरील रो-रो सेवा चालणार का अशीही शंका आहे. मोरा जेट्टीचे काम लवकरच सुरू करण्यात आले असून मार्च २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती मेरिटाईम बोर्डाचे कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी दिली.

# वाजे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी पदू वाघ यांची बिनविरोध निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाजे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी पदू नारायण वाघ बिनविरोध यांची बिनविरोध निवड झाली आहे. याबद्दल त्यांचे भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पदू वाघ यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

वाजे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक शुक्रवारी (दि. २४) झाली. या निवडणुकीत पदू वाघ यांची बिनविरोध निवड होताच समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष केला.

या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, ज्ञानेश्वर पाटील, सरपंच मदन भालेकर, अंजली भालेकर, गणेश पाटील, भारती भालेकर, काळी कातकरी, राजेश भोईर, राघो पाटील, रूपेश भोईर, अनिल भोईर, किशोर पाटील, निलेश पाटील, रेवन पाटील, शाम भालेकर, गणपत पाटील, बाळा भालेकर, प्रमोद भालेकर, काळूराम भोईर, नथू भगत, पांडुरंग डुकरे, शाम कातकरी, सागर भालेकर, बळीराम भालेकर, राजेश पाटील, तेजस पाटील, मथुरा पाटील, ज्ञानेश्वर पाटील, अंबाजी पाटील, अभय केणी यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# एफ.जी. नाईक महाविद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सवाचा जल्लोष

**नवी मुंबई : बातमीदार**

श्रमिक शिक्षण मंडळ यांचे एफ जी नाईक वाणिज्य माहिती तंत्रज्ञान व कला महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा महोत्सव २० व २१ जानेवारी २०२५ रोजी झाला. या कार्यक्रमाचे औपचारिक उद्‌घाटन कॉलेजच्या माझी विद्यार्थी व राष्ट्रीय खेळाडू तेजस कदम, पूजा फरगडे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी रा. फ. नाईक विद्यालयाचे मुख्याध्यापक रवंद्र पाटील, उप-मुख्याध्यापिका चारुशीला चौधरी व पर्यवेक्षिका कुरणे, क्रीडा शिक्षक पश्टे, मयूर पलांडे, संदीप शिकारे व शुभम दळवी ही उपस्थित होते.

प्रास्ताविक पर भाषणात महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रताप महाडिक यांनी सांघिक भावना जपत खेळ खेळण्यास विद्यार्थ्यांना प्रेरित केले. उत्तम उत्तम खेळ खेळत विद्यार्थ्यांनी आपले उज्वल भविष्य घडवत महाविद्यालयाचे व देशाचे नाव झळकवावे असे आव्हान केले. कार्यक्रमावेळी उपस्थित झालेल्या राष्ट्रीय खेळाडूंनी आपले मनोगत व्यक्त केले. क्रीडा महोत्सवांमध्ये क्रिकेट, खो खो, कबड्डी, रीले, बॅडमिंटन, चेस कॅरम या खेळांच्या स्पर्धा झाल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका सीमा शिंदे यांनी केले. प्राचार्य व क्रीडा समितीच्या अध्यक्षा प्राध्यापिका समिधा पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# आरोग्य शिबिरांचा १,६९,११४ नागरिकांनी घेतला लाभ

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये हिवताप /डेंग्यू आजाराचा प्रसार रोखण्यासाठी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागामार्फत विशेष शिबीरांचे आयोजन केले जात असून या शिबिरांना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. शिबिरांना भेटी दिलेल्या नागरिकांमध्ये हिवताप /डेंग्यू आजारांबाबत प्रभावीपणे जनजागृती करण्यात आली.

याप्रमाणे नमुंमपा कार्यक्षेत्रात जास्तीच जास्त नागरिकांपर्यंत पोहचून जनजागृती करण्याकरिता दि. २३ जानेवारी २०२५ रोजी २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत विविध ठिकाणी जाहीर शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरांकरिता १०१३९ नागरिकांनी भेट दिली असून, ६९७ रक्तनमुने घेण्यात आले.



नमुंमपा कार्यक्षेत्रात हिवताप / डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करण्याकरिता दिनांक ०३ ऑगस्ट २०२४ ते दिनांक २३ जानेवारी २०२५ या कालावधीत एकुण ३९४ जाहीर शिबीरांचे आयोजन करण्यात आले असून एक लाख ६९ हजार ११४ नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेतला आहे. त्यामध्ये एकूण १५ हजार ३०७ रक्त नमुने घेण्यात आले आहेत.

याशिवाय गणेशोत्सव कालावधी, नवरात्रौत्सव कालावधी व इतर धार्मिक कार्यक्रमांमध्ये हिवताप अथवा डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करण्याकरिता शिबीरांचे आयोजन करण्यात येते.

या शिबिरांचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये नॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात दाखवून, तसेच नागरिकांना डासांच्या अळ्या प्रत्यक्ष दाखवून तसेच पाणी साठवून ठेवलेले ड्रम ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंदिस्त करणे, त्याबरोबरच घराभोवती व घरांतर्गत असणारी डासोत्पत्ती स्थानांची माहिती करून देणे, पाणी साठविण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे व आठवड्यातून एक दिवस स्वच्छ करुन कोरड्या ठेवणे, भंगार साहित्य टायर्स इ. नष्ट करणे, छतावरील प्लास्टीक शिट, ताडपत्री यामध्ये पाणी साचू न देणे व ताप येताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे याबाबत नागरिकांना प्रोत्साहित करुन आवाहन करण्यात आले.

आरोग्य विभागाच्या कार्यवाहीसोबतच नवी मुंबईकर नागरिकांनी घरातील व घराभोवतालची डासउत्पत्ती स्थाने नष्ट करणे तसेच आपले घर व परिसर स्वच्छ ठेवणे, आजुबाजूचा परिसर / टेरेसवरील भंगार नष्ट करणे आदी बाबींवर लक्ष दिले तर नवी मुंबईत हिवताप अथवा डेंग्यू आजारावर आळा घालणे शक्य होईल असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा वापर करा -डॉ. महेश केळुसकर

**नवी मुंबई : बातमीदार**

मराठी भाषेला दोन हजार वर्षांपासूनचा इतिहास असून अभिजात भाषा म्हणून त्यावर केंद्र सरकारचे शिक्कामोर्तब झाले याचा मराठी भाषिक म्हणून अभिमान बाळगत असताना दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा कटाक्षाने वापर केला पाहिजे, असे मत साहित्यिक कवी डॉ.महेश केळुसकर यांनी व्यक्त करीत मराठी भाषेची महती विविध उदाहरणे देत उलगडली.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली १४ ते २८ जानेवारी या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अंतर्गत 'मायबोली अभिजात मराठी' विषयावरील व्याख्यानातून डॉ.महेश केळुसकर यांनी मराठीचा जागर केला.

भाषेचे प्रमुख कार्य हे संदेशवहन असून आपल्या बोलण्याचा अर्थ ऐकणाऱ्याला कळावा याकरिता कोणत्याही भाषेची प्रमाण भाषा महत्वाची असते हे सांगत मराठीच्या ६८ बोलीभाषा हया तिच्या रक्तवाहिन्या असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्रात मराठी भवन असावे व त्यामध्ये बोलीभाषांचे प्राधिकरण स्थापन व्हावे तसेच याव्दारे मराठी भाषेला समृध्द करणाऱ्या बोलीभाषांचा अभ्यास व्हावा यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. मराठी भाषा विषयक काम करणारी शासनाची सर्व कार्यालये एकाच छताखाली असतील तर परस्पर समन्वय राहून भाषेच्या विकासाला अधिक गती मिळेल, असेही ते म्हणाले.

मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण हे सर्वांगीण विकासासाठी महत्वाचे असते असे जगभरचे शिक्षणतज्ज्ञ सांगतात. त्या अनुषंगाने सुरुवातीपासूनच मराठीतून शिक्षण अंगीकारले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त




केले. सध्याचा काळ हा प्रसिध्द व्यक्तींचे अनुकरण करण्याचा काळ असून विविध क्षेत्रात प्रसिध्द मराठी व्यक्तींनी मराठी बोलण्याचा आग्रह धरला पाहिजे जेणेकरून त्यांचे अनुकरण मराठी चाहते करतील असा वेगळा विचार त्यांनी मांडला.

७२ देशांमध्ये मराठी बोलली जाते, १५ विद्यापीठांमध्ये शिकवली जाते व १२ कोटीहून अधिक लोक मराठीत बोलतात. त्यामुळे मराठी संपली अशी ठोकली जाणारी बोंब अनाठायी असल्याचे सांगत डॉ.महेश केळुसकर यांनी मराठी भाषेची तुलना नवजात अर्भकाला निकोप वाढीसाठी आवश्यक असलेल्या आईच्या दूधाशी केली.

मराठी भाषेचे महत्त्व सांगताना त्यांनी साहित्यिक वि.स.खांडेकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, डॉ.भालचंद्र नेमाडे या चार ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त मराठी साहित्यिकांची महती सांगितली तसेच कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांची 'चंद्र' व विंदा करंदीकरांची 'धोंडया न्हावी' या कविता सादर केल्या. 'झिनझिनाट' या स्वत:च्या गाजलेल्या कवितेने त्यांनी व्याख्यानाची सांगता केली.

नवी मुंबई महानगरपालिका भाषा विकासासाठी शासकीय सोपस्कार म्हणून कार्यक्रम न करता आत्मियतेने कार्यक्रम आयोजित करीत असल्याचे कौतुक करीत डॉ.महेश केळुसकर यांनी मराठी भाषेचे अभिजातपण सिध्द झाल्यानंतर त्याचा लौकिक वाढविणे ही आपली जबाबदारी असून प्रत्येकाने त्यासाठी आपल्या परीने संपूर्ण योगदान द्यावे, असे आवाहन केले.

नवी मुंबई महापालिका विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून मराठी भाषेचे महत्त्व प्रसारीत करीत असून त्यांना चांगला प्रतिसादही मिळत आहे असे सांगत अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी मराठी भाषेच्या विकासासाठी नवी मुंबई महानगरपालिका कटिबध्द असल्याचे मत व्यक्त केले.

# विद्यार्थी-पालक निवारा शेडचे लोकार्पण

## आमदार मंदा म्हात्रे यांच्या निधीतून विकासकामे

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहर हे झपाट्याने विकासाच्या मार्गाने जात आहे. तसेच आमदार मंदा म्हात्रे यांचे २० वर्षापासून आमदार निधीमधून नवी मुंबई शहरामध्ये विकासकामे केली जात आहेत. वाशी येथील सेंट मेरी स्कूल जवळ विद्यार्थी पालक निवारा शेड चा लोकार्पण सेंट मेरी स्कूलचे प्राचार्य फादर अब्राहम जोसेफ यांच्याहस्ते संपन्न झाले.

आमदार मंदा म्हात्रे म्हणल्या की, विद्यार्थ्यांना व पालकांना उन्हापावसात शाळे बाहेर ताटकळत उभे राहावे लागत होते. त्यामुळे वाशी येथील विविध विभागातील नागरिकांच्या व पालकांच्या तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या मागणी नुसार सदर विद्यार्थी पालक निवारा शेड उभारण्यात यावे, अशी मागणी केली होती. त्याच अनुषंगाने जे बोलते ते करते या वाक्याचे अर्थाने आज वाशी येथी सेंट मेरी स्कूल जवळ



विद्यार्थी पालक निवारा शेड विद्यार्थी व पालाकांकरिता खुला करण्यात आला. त्यामुळे पालक व विद्यार्थी वर्गाला व ज्येष्ठ नागरिकांना आमदार मंदा म्हात्रे यांच्यामुळे एक आधार उपलब्ध झाला असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले. यामुळे वाशी विभागातील ज्येष्ठ नागरिक व पालक व विद्यार्थी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून आमदार मंदा म्हात्रे यांचे वाशी विभागातील पालक, विद्यार्थी व नागरिकांनी आभार मानले आहे.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत माजी नगरसेवक राजू शिंदे, माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, विकास सोरटे, प्रताप भोसकर, रामकृष्ण अय्यर, मुकुंद विश्वासराव, पाशाभाई, प्रवीण चिकणे, क्षितिजा घोरपडे, मालती सोनी, प्रमिला खडसे, सुवर्णा चिकणे, राखी पाटील, रामनाथ म्हात्रे, प्रवीण भगत, क्षितीज म्हात्रे, महेश दरेकर, जेम्स आवारे तसेच उपभियंता किरण पाटील, कनिष्ठ अभियंता विनोद आंबरे, वाशी विभाग अधिकारी सागर मोरे तसेच असंख्य ज्येष्ठ नागरिक व महिला उपस्थित होते.

# गव्हाण विद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून ब्रिटिशांना हद्दपार करून देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याच्या ध्येयानेप्रेरित झालेले प्रखर राष्ट्रभक्त देशभक्त नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या येथील गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

शस्त्र क्रांतिकारी चळवळीचा इतिहास पाहिला तर अनेक क्रांतिकारक आपल्या डोळ्यासमोर उभे राहतात. भारतात राहून देश कार्य करणे आपण मान्य करू शकतो. पण भारताबाहेर राहून सुद्धा स्वतःच्या देशासाठी क्रांतिकारक लढा देणे, भारतीयांना तुम



मुझे खून दो, मै तुम्हे आजादी दूंगा!! असं सांगून प्रोत्साहित करणे, खरंच अतिशय प्रेरक कार्य आहे. वेशांतर करून भारताबाहेर पलायन करून आझाद हिंद सरकार ची स्थापना करून आपले सहकारी रासबिहारी बोस यांच्या आझाद हिंद सेनेचे नेतृत्व करणाऱ्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेज गव्हाण कोपर येथे साजरा करण्यात आली.सौ. सारिका ठाकूर मॅडम यांच्या इयत्ता आठवी ड च्या वर्गाचा हा कार्यक्रम होता.

या वेळी विद्यालयाचे प्राचार्य जी.सी. गोडगे ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख पाटोळे तसेच रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर आर.एस. भोईर यांनी प्रतिमा पूजन करून श्रीफळ वाढविले. या वेळी क्रीडा शिक्षक एस एस. पारखे, यु डी पाटील, डी के म्हात्रे, सी.एम. पाटील, गोंधळी मॅडम तसेच आदर्श विज्ञान शिक्षक एस एच म्हात्रे, आर एन चौधरी तसेच पी एन परदेशी आवर्जून उपस्थित होते. त्याचप्रमाणे इतर सर्वकांनी प्रतिमा पूजन केले. या वेळी सूत्रसंचालन आणि मनोगत पर विचार सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर. पाटील यांनी व्यक्त केले.

# सिडको महागृहनिर्माण योजनेला प्रतिसाद

## अनुभूती केंद्रात इच्छुक अर्जदारांची गर्दी

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

क्रेडाई, नवी मुंबई व क्रेडाई, रायगड या संस्थांनी तांडेल मैदान, सीवूडस, नवी मुंबई येथे २४ जानेवारी ते २७ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजित केलेल्या नवी मुंबई प्रॉपर्टी प्रदर्शनात सिडको महामंडळाने सहभाग घेतला आहे. येथे उभारण्यात आलेल्या स्टॉलवर नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्यात येत आहे व अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेबाबत आवश्यक माहिती दिली जात आहे.

या प्रदर्शनातील स्टॉलवरच नागरिकांच्या सोयीसाठी अर्ज नोंदणीची तसेच अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रदर्शनास भेट देताना इच्छुक अर्जदारांनी आवश्यक ती कागदपत्रे सोबत आणावीत असे आवाहन सिडको महामंडळातर्फे करण्यात येत आहे.

प्रॉपर्टी प्रदर्शन केंद्रापासून सिडको गृहनिर्माण योजनेच्या साईटवर भेट देण्यासाठी विशेष बसेसची सुविधा उपलब्ध



करून देण्यात आली आहे. अर्जदारांना आपले पसंतीचे सिडकोचे घर निवडताना मदत होण्यासाठी सिडकोतर्फे योजनेतील सदनिकांचे स्वरूप पाहता यावे याकरिता खारघर, सेक्टर-१४, खारघर (पूर्व) तळोजा, सेक्टर-३७ व खांदेश्वर, सेक्टर-२८ येथे अनुभूती केंद्रांची स्थापनाही करण्यात आली आहे. असंख्य इच्छुक अर्जदार या अनुभूती केंद्रांना भेट देत आहेत व त्यांच्या स्वप्नातल्या घराची अनुभूती घेत आहेत.

३१ जानेवारी २०२५ या तारखेपर्यंतच योजनेकरिता ऑनलाइन नोंदणी करण्याची व सदनिकांचा प्राधान्यक्रम सादर करण्याची शेवटची सुवर्णसंधी उपलब्ध आहे. याकरिता अधिकाधिक अर्जदारांनी https://cidcohomes.com या संकेतस्थळाला भेट देऊन लवकरात लवकर अर्ज नोंदणी, अनामत रकमेचा भरणा व आपल्या पसंतीच्या १५ सदनिकांचा प्राधान्यक्रम सादर करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी आणि आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार करावे, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

# रोह्यात स्व. बाळासाहेब ठाकरे स्मारकाचे लोकार्पण

## मंत्री भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, महेंद्र थोरवे यांची उपस्थिती



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरातील वीर सावरकर रोड व बसस्थानकाशेजारी स्व. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या भव्य स्मारकाचे लोकार्पण रोजगार हमी व फलोत्पादन कॅबिनेट मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले.

या लोकार्पण सोहळ्यास आमदार महेंद्र दळवी, महेंद्र थोरवे, शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, राजा केणी, तालुकाप्रमुख मनोजकुमार शिंदे, शहरप्रमुख मंगेश रावकर, युवासेनाप्रमुख जिल्हा विपुल उभारे, उस्मान रोहेकर, आशिष जंगम आदींसह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, कामगार सेना, ग्राहक संरक्षण कक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व शिवसैनिक उपस्थित होते.

या वेळी मंत्री भरत गोगावले यांनी चांगले स्मारक रोहा शहरात झाल्याचे सांगितले. मनोजकुमार शिंदे यांनीही चांगले काम केल्याचे सांगून स्मारक तयार करताना काही अडचणी आल्या होत्या, परंतु मंत्रीमहोदयांच्या माध्यमातून त्या अडचणी सोडवण्यात आल्या आहेत, असे सांगितले.

# ‘महाज्योती’तर्फे विद्यार्थ्यांना टॅब वाटप

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सध्या स्पर्धेच्या काळात ऑनलाईन शिक्षणाला अधिक महत्त्व प्राप्त झाल्यामुळे इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर या संस्थेच्या वतीने मोफत टॅबचे वाटप करण्यात आले आहे. विदयार्थ्यांनी याचा गुणवत्ता वाढीसाठी उपयोग करावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृह येथे महाज्योती संस्थेच्या वतीने मोफत टॅब वाटप



कार्यक्रमात जिल्हाधिकारी बोलत होते.यावेळी सहायक आयुक्त समाज कल्याण समाधान इंगळे उपस्थित होते. जिल्हाधिकारी यांच्या हस्ते महाज्योतीमार्फत इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील २४विद्यार्थ्यांना मोफत टॅबचे वाटप करण्यात आले.

महाज्योती योजनेअंतर्गत, विज्ञान शाखेच्या अंतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत कोचिंगसाठी मोफत टॅब्लेटचे वाटप केले जाते. ज्याचा वापर करून आर्थिकदृष्ट्या मागासलेले विद्यार्थी त्यांच्या शिक्षणाचा आणि त्यांना मिळालेल्या या सुविधांचा उपयोग करून त्यांचे भविष्य सुधारू शकतात.


महाज्योती संस्थेच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत ऑनलाईन प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोफत टॅब सोबत दररोज सहा जीबी इंटरनेट डेटाची सुविधा नीट परीक्षा होईपर्यंत साधारण दीड वर्षे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# श्रीवर्धन तालुक्यात कोकम लागवडीला चालना मिळावी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात आंबा व काजू या लोकप्रिय फळांच्या पिकांसोबतच कोकम या बहुगुणी फळांच्या लागवडीकडे दुर्लक्ष होत आहे. कोकम, ज्याला ’औषधी फळ’ म्हणून ओळखले जाते ते विविध प्रकारे व्यावसायिक उत्पादनासाठी वापरता येते आणि त्याच्या प्रक्रियेतून तयार होणाऱ्या पदार्थांना बाजारात चांगला भाव मिळतो. यामुळे भविष्यकाळात बागायतदारांनी कोकमाची लागवड केली, तर त्यांना आर्थिकदृष्ट्या मोठा फायदा होऊ शकतो.

श्रीवर्धन तालुक्यातील हवामान आणि जमीन आंबा व काजू यांच्या लागवडीसाठी योग्य असली तरी, या तालुक्यात कोकमाच्या लागवडीला प्राधान्य दिले जात नाही. यासाठी बागायतदारांना जागरूक करण्याची आवश्यकता आहे. कोकमाच्या झाडांची लागवड साधारणपणे पाचव्या वर्षापासून फळधारणेला प्रारंभ करते. त्यामुळे कोकम एक दीर्घकालीन आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर पीक ठरू शकते.



श्रीवर्धन तालुक्यातील आंबा आणि काजू यांसारख्या वार्षिक फळांपेक्षा कोकमाच्या लागवडीला अधिक चालना मिळाली पाहिजे. विद्यमान आकडेवारीनुसार श्रीवर्धन तालुक्यात आंब्याचे उत्पादनक्षेत्र १९१० हेक्टर, काजूच्या लागवडीचे क्षेत्र ६४५ हेक्टर असून कोकमाच्या लागवडीचे क्षेत्र अत्यंत कमी म्हणजेच ११.६७ हेक्टर इतकेच आहे.

कोकमाच्या लागवडीसाठी पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनी आणि उष्ण व दमट हवामान उपयुक्त ठरतात. ते पाहता श्रीवर्धन तालुक्यात कोकमाच्या लागवडीला चांगला वाव आहे. या क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी बागायतदारांनी कोकमाची लागवड करणे आवश्यक आहे, जे त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ करणारे ठरू शकते.

**कृषी विभागाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि वृक्षजन्य तेलबिया अभियानांद्वारे कोकम लागवडीसाठी शेतकऱ्यांना अनुदान उपलब्ध आहे. श्रीवर्धन तालुक्यातील बागायतदारांनी या योजनांचा योग्य लाभ घेत कोकम लागवडीला प्राधान्य देऊन आपल्या उत्पादनक्षेत्रात वाढ करावी. यामुळे त्यांना आर्थिकदृष्ट्या चांगला फायदा होऊ शकतो.**

**–श्रद्धा डुंबरे,**
**कृषी अधिकारी, श्रीवर्धन**

# लायन्स क्लबच्या रुग्णालयासाठी सहकार्य करणार -ॲड. राहुल नार्वेकर

**अलिबाग : प्रतिनिधी**

गेल्या काही दशकांमध्ये अलिबागने सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रात प्रगती केली आहे, परंतु अलिबाग परिसरात अद्ययावत आरोग्य सुविधा पुरेशा प्रमाणात नाहीत. या परिसराला आधुनिक आरोग्य सुविधांची गरज आहे. ती काळाची गरज आहे. लायन्स क्लब अलिबाग तालुक्यातील सोगाव येथे अत्याधुनिक रुग्णालय उभारत आहे. मी व्यक्तिगत पातळीवर आणि विधानसभेचा अध्यक्ष म्हणून या उपक्रमासाठी नेहमीच सहकार्य करीन, अशी ग्वाही महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी दिली.



लायन्स क्लब अलिबाग यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या अलिबाग फेस्टीवलचे उद्‌घाटन ॲड. राहुल नार्वेकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, लायन्स क्लबचे नयन कवळे, प्रवीण सरनाईक, गौरी म्हात्रे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी लायन्स क्लबने उचललेले पाऊल प्रशंसनीय आहे. हे रुग्णालय लवकर सुरू व्हायला हवे. त्यासाठी समाजातील प्रत्येकाने यासाठी आर्थिक मदत, श्रमदान आणि सहकार्य करावे. मी व्यक्तिगत पातळीवर आणि विधानसभेचा अध्यक्ष म्हणून या उपक्रमासाठी नेहमीच सहकार्य करीन, असे ॲड. राहुल नार्वेकर म्हणाले.

मुंबईच्या जवळ असल्याने पायाभूत सुविधा आणि दळणवळणाच्या प्रकल्पांमुळे अलिबागची प्रगती वेगाने होत आहे. अलिबागला तिसऱ्या मुंबईचा दर्जा मिळत आहे. अटल सेतू, रेवस करंजा पूल यामुळे येणाऱ्या काळात मंत्रालयापासून अलिबागला अवघ्या पाऊण तासात पोहचणे शक्य होणार आहे. त्यामुळे अलिबागचा परिसर झपाट्याने विकसित होणार आहे. चांगली शाळा, महाविद्यालये, हॉटेल्स, रेस्टॉरंट्स तयार होत असून शहराचा विकास होत आहे, मात्र अद्ययावत आरोग्य सुविधा पुरेशा प्रमाणात नाहीत. या परिसराला आधुनिक आरोग्य सुविधांची गरज आहे. ही गरज लायन्स क्लबच्या रुग्णालयातून भागवली जाईल. त्यामुळे सोगाव येथे उभारण्यात येणाऱ्या रुग्णालयाला सर्वांनी आर्थिक सहकार्य करणे आवश्यक आहे, असे आवाहन विधानसभा अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी केले.

# अहिल्यादेवी विशेषांकाचे प्रकाशन




**खोपोली : प्रतिनिधी**

एकता मासिकाच्या वतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जन्म वर्षानिमित्त काढण्यात आलेल्या अहिल्यादेवी विशेषांकाचे प्रकाशन राष्ट्रसेविका समितीच्या मुख्य संचालिका शांताक्का यांच्या हस्ते नुकतेच महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या सभागृहात झाले.

व्यासपीठावर महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, हिंदुस्तान प्रकाशन संस्थेचे दिलीप करंबेळकर, एकता फाउंडेशनचे अध्यक्ष दत्तात्रय आंबुलकर, समितीच्या क्षेत्रीय कार्यवाहिका सुनंदा जोशी, एकता मासिकाच्या संपादिका रूपाली भुसारी आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रारंभी दिलीप करंबेळकर यांनी एकता मासिक आणि राष्ट्रसेविका समिती यांनी सुरू केलेल्या उपक्रमालाबद्दल समाधान व्यक्त केले. संपादिका रूपाली भुसारी यांनी एकता मासिकाच्या कामाची माहिती, अंकाचे स्वरूप उपस्थितांसमोर कथन केले. एकता फाउंडेशनचे अध्यक्ष दत्तात्रय अंबुलकर यांनी प्रारंभी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अनुजा कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

# रेखा कला परीक्षेत गव्हाणकर विद्यामंदिरचे शंभरनंबरी यश

**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शासन कला संचालनालय, मुंबई यांच्या अंतर्गत सप्टेंबर २०२४मध्ये शासकीय रेखाकला परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत माथेरानमधील प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर या शाळेचा निकाल शंभर टक्के लागला.

दरवर्षी चित्रकलेच्या एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट परीक्षा संपूर्ण राज्यात एकाच वेळी घेतल्या जातात. राज्यभरातील चित्रकलेची आवड असलेले विद्यार्थी ही परीक्षा देत असतात. माथेरान येथील प्राचार्य गव्हाणकर विद्यालयातील विद्यार्थी मागील तीन वर्षे सातत्याने १०० टक्के यश मिळवित असतात. संघपाल वाठोरे हे शिक्षक या सर्व विद्यार्थ्यांची तयारी करून घेत असतात. या वर्षी माथेरानमधील प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर एकाच शाळेतील एकूण २८ विद्यार्थी शासकीय रेखाकला परीक्षेस बसले होते. ते सर्वच्या सर्व उत्तीर्ण झाले आहेत. त्यांना इयत्ता दहावी बोर्डाच्या परीक्षेत ब्रेड वाईस ७, ५ आणि ३ याप्रमाणे अतिरिक्त गुण मिळतील.

# पोलादपूर गौरव पुरस्कार वितरण सोहळा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील कापडे बुद्रुक येथे विविध क्षेत्रातील व्यक्ती व संस्थांचा पोलादपूर गौरव पुरस्कार प्रदान सोहळा आकार प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.



या पुरस्कार वितरण सोहळयात उद्योजक संतोष मेढेकर, सहयोग प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष रमेश चव्हाण, दत्तात्रेय काठाळे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार सुभाष जगदाळे, माजी सभापती दिलीप भागवत, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोकण कार्याध्यक्ष शैलेश पालकर, कोमसाप जिल्हाध्यक्ष सुधीर शेठ, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते यशवंत मोरे, वाकणचे नारायण साने, मोरगिरीचे सरपंच शरद जाधव, प्रमोद शिंदे, व सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक दत्तोपंत साळुंखे, माळी तसेच अजितकुमार जंगम आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

या वेळी पोलादपूर तालुका आदर्श शिक्षक पुरस्कार गोळेगणीचे सचिन दरेकर, सवादच्या सुनंदा दिलीप जावळे, कृषी रत्न पुरस्कार वाकणचे संभाजी सालेकर, भाषा गौरव पुरस्कार पोलादपूरच्या अरुणा अजित भागवत, प्रबोधन रत्न पुरस्कार तुर्भेतील ह.भ.प. शिवममहाराज कदम, आदर्श शाळा चरई, लोहारेतील साने गुरुजी विद्यालय, क्रीडा रत्न पुरस्कार रानवडीतील श्रुती उतेकर, सेवा रत्न पुरस्कार अनिल पवार (ग्रामसेवक) लोहारे, उद्योग रत्न पुरस्कार कापडे फौजदारवाडीतील अशोक पवार, समाजरत्न पुरस्कार तुर्भेतील शिवराम उतेकर यांना सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ प्रदान करून गौरविण्यात आले.

प्रतिष्ठानतर्फे अध्यक्ष अजय सलागरे, उपाध्यक्ष रामदास सकपाळ, सचिव राजाराम शेलार, सहसचिव ज्ञानेश्वर उतेकर, खजिनदार रविकांत सकपाळ, सहखजिनदार सुनील चव्हाण यांनी सोहळ्याचे आयोजन केले होते. सहसचिव ज्ञानेश्वर उतेकर यांनी सूत्रसंचालन केले.

# कर्जतमध्ये आगरी समाजभूषण पुरस्कारांचे वितरण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या वतीने देण्यात येणाऱ्या आगरी समाजभूषण पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. स्वातंत्र्यसैनिक राघो नागो भगत तथा भगत मास्टर, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य नागो गवळी आणि कर्जत पंचायत समितीचे माजी उपसभापती अरविंद पाटील यांना या वेळी सन्मानित करण्यात आले.

हुतात्मा हिराजी पाटील यांच्या १११व्या जयंतीनिमित्त कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या माध्यमातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नेरळ बोपेले येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला समाज संघटनेचे अध्यक्ष सुरेश टोकरे, माजी अध्यक्ष सावळाराम जाधव, माजी पंचायत समिती उपसभापती मनोहर थोरवे, सभापती अमर मिसाळ, कोल्हारे ग्रामपंचायतीचे सरपंच महेश विरले, इतिहास संशोधक वसंत कोळंबे, माजी उपाध्यक्ष केशव मुने, मनीषा दळवी, सुमन लोंगले आदी उपस्थित होते.

आगरी समाज संघटनेच्या वतीने देण्यात येणाऱ्या आगरी समाजभूषण पुरस्कार २०२५ या वर्षी तालुक्यातील तीन व्यक्तींना देण्यात आला. मानपत्र, सन्मानचिन्ह असे स्वरूप असलेला हा पुरस्कार स्वातंत्र्यसैनिक राघो भगत यांना मरणोत्तर तसेच माजी उपसभापती अरविंद पाटील आणि माजी जि.प. सदस्य नागो गवळी यांना देण्यात आला. कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष असलेले स्वातंत्र्यसैनिक भगत मास्तर यांचा पुरस्कार त्यांचे पुत्र शरद भगत यांनी स्वीकारला. हुतात्मा हिराजी पाटील यांची १९ जानेवारी १९१४ ही जन्मतारीख शोधण्याचे कार्य करणारे इतिहास संशोधक वसंत कोळंबे यांनी हुतात्मा भाई कोतवाल, हिराजी पाटील तसेच कोतवाल दस्ता यांच्या चळवळीचा आढावा घेणारे व्याख्यान दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय कोंडीलकर यांनी, तर सूत्रसंचालन संतोष जामघरे यांनी केले. या सोहळ्यात उमरोली येथील गायक सचिन लोंगले यांनी तयार केलेल्या हुतात्मा हिराजी पाटील यांच्या जीवनावरील गीतांचे लोकार्पण करण्यात आले.




वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर

GENERAL EDUCATION INSTITUTE'S
ENGLISH MEDIUM SCHOOL, URAN
Admission Open
FOR ACADEMIC YEAR
2025-2026
For Std-1 st
RTE Forms-Online Form
14 Jan 2025 to 27 Jan 2025
Website: http://student.maharashtra.gov.in
Contact : Head Mistress
G.E.I.'s English Medium School, Uran.
(Pre-Primary/Primary Section)
Ph.No.7208642983

